# मलिक बेननबी

## यांच्या अभिसंस्कृतीविषयक दृष्टीकोनाचा

# सामाजिक-बौद्धिक पाया

BADRANE BENLAHCENE



THE SOCIO-INTELLECTUAL FOUNDATIONS OF
MALEK BENNABI'S APPROACH
*to* CIVILIZATION

IIIT Books-In-Brief Series

# मलिक बेननबी
## यांच्या अभिसंस्कृतीविषयक दृष्टीकोनाचा
# सामाजिक-बौद्धिक पाया


✻ लेखक ✻

बॅडरेन बेनलाहसेन

✻ संक्षिप्तीकरण ✻

एलीसन लेक



Institute of Objective Studies

© IIIT, 1444 AH / 2023 CE
IIIT, P.O. Box 669, Herndon, VA 20172, USA ● www.iiit.org
P.O. Box 126, Richmond, Surrey TW9 2UD, UK ● www.iiituk.com

*This book is in copyright. Subject to statutory exception and to the provisions of relevant collective licensing agreements, no reproduction of any part may take place without the written permission of the publishers.*

**ISBN : 978-93-91659-21-9**

*The views and opinions expressed in this book are those of the author and not necessarily those of the publisher. The publisher is not responsible for the accuracy of URLs for external or third-party internet websites, if cited, and does not guarantee that any content on such websites is, or will remain, accurate or appropriate.*

**Malek Bennabi Yanchya Abhisanskriti Vishayak Drishtikon**
**Samajik Boudhik Paya**
(Marathi)
**Badrane Benlahcene**

**Translator: Hayatmahammad Pathan**
**Translation of The Socio-Intellectual Foundations of**
**Malek Bennabi's Approach to Civilization**
IIIT Books-in-Brief Series

Original title in English was published in 2013 by IIIT

First published in Marathi, 2023
Published in India by: Institute of Objective Studies
162, Jogabai Main Road, Jamia Nagar, New Delhi 110025
email: ios.newdelhi@gmail.com | www.iosworld.org

Distributed by
Genuine Publications and Media Pvt. Ltd.
B - 35 (LGF), Nizamuddin West, New Delhi 110013
Tel.: +91-11-41827475, 24352732, 24352048
email: info@genuinepublications.com | www.genuinepublications.com

Printed at:Bosco Society for Printing and Graphic Training, New Delhi
Price: ₹ 50.00

## IIIT संक्षिप्त पुस्तक मालिका

IIIT संक्षिप्त पुस्तक मालिका संस्थेचा बहुमोल प्रकाशन संग्रह आहे. वाचकांना मूळ लेखनाचा गाभा कळण्यासाठी संक्षेपात दिलेला हा सार आहे. याची निर्मिती आटोपशीर स्वरूपाची आहे. तसेच वाचनास सोपी व वेळेची बचत करणारी आहे. बारकाईने लिहिलेला हा सारांश मोठ्या ग्रंथाचा जवळून घेतलेला धांडोळा आहे. हा प्रयत्न वाचकांना मुख्य लेखन वाचण्यासाठी प्रेरित करेल, अशी आशा आहे.

**सोशियो–इंटिलेक्च्युअल फाऊंडेशन्स ऑफ मलिक बेननबीज् ॲप्रोच टू सिव्हिलायझेशन** हे पुस्तक २०११मध्ये पूर्ण स्वरूपात प्रसिद्ध झाले. सॅम्युएल हंटिंगटन यांच्या 'द क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन' या निबंधाने जागतिक व्यवस्थेबाबत संस्कृती आणि संघर्षाच्या चर्चेला पुन्हा चालना दिली. थोर अल्जेरियन विचारवंत, मुस्लिम बुद्धिजीवी मलिक बेननबी (१९०५–१९७३) यांनी सुरुवातीला मुस्लिमांच्या ऱ्हासाची आणि पाश्चात्त्यांच्या अभिसंस्कृती आणि संस्कृतीच्या यशाची कारणे शोधण्यावर लक्ष केंद्रित केले. त्यांनी मूळ समस्या कुरआन किंवा इस्लाममध्ये नसून ती स्वतः मुस्लिमांमध्ये असल्याची सैद्धांतिक मांडणी केली. बॅडरेन बेनलाहसेन यांनी बेननबी यांचा अभिसंस्कृती विषयक दृष्टीकोन आणि त्यांनी मांडलेल्या मूलतत्त्वांचा शोध घेतला आहे. त्यासाठी त्यांनी आधिसैद्धांतिकीकरण (मेटॅथेराइझिंग) पद्धतिशास्त्राचा उपयोग केला आहे. हे करत असताना त्यांनी बेननबी यांच्या सिद्धांतातील आणखी एका महत्त्वपूर्ण मूलतत्त्वावर प्रकाश टाकला आहे. अभिसंस्कृतीचे संचालन हे आतील – बाहेरील आणि सामाजिक–बौद्धिक कारकांकडून होते. तसेच हे दोन्ही कारक अभिसंस्कृतीनेच जन्माला घातलेले असतात. बेननबींच्या मते, 'माणूस+ माती+काळ=अभिसंस्कृती' हे समीकरण आणि धर्मात सामावलेले सर्व महत्त्वाचे उत्प्रेरक स्पष्ट आहेत आणि मुस्लिमांच्या ऱ्हासाची कारणे उलटवणारा शोध महत्त्वाचा आहे. बेननबींच्या मते, कोणत्याही अभिसांस्कृतिक प्रक्रियेत माणूस केंद्रीय शक्ती आहे आणि त्याच्याशिवाय इतर दोन्ही घटकांना अर्थ नाही, हे आपल्याला स्पष्ट दिसते.

मुस्लिमांनी त्यांची आध्यात्मिक स्थिती बदलल्याशिवाय ते समाजात लक्षणीय आणि दूरगामी अर्थपूर्ण बदल घडवून आणू शकत नाहीत हे बेननबी यांचे अचूक निदान कुरआनात ध्वनित झाले आहे. खरंच, जोपर्यंत लोक स्वतः त्यांच्यात बदल करत नाहीत, तोपर्यंत अल्लाह त्यांची स्थिती बदलत नाही. (कुरआन १३:११)

संक्षिप्तीकरण : **एलीसन लेक**
**बॅडरेन बेनलाहसेन** यांच्या
**The Socio-Intellectual Foundations of Malek Bennabi's Approach to Civilization**
या मूळ ग्रंथाच्या संक्षिप्त इंग्रजी आवृत्तीवरून.
ISBN hbk : 978-1-56564-368-0
ISBN pbk : 978-1-56564-367-3
2011

## प्रस्तावना

हे पुस्तक अल्जेरियन विचारवंत आणि थोर मुस्लिम बुद्धिजीवी मलिक बेननबी (१९०५-१९७३) यांच्या संशोधन कार्यावर प्रकाश टाकते. ते त्यांचे पद्धतिशास्त्र व तत्त्वज्ञान यांविषयी नवी दृष्टी प्रदान करणारे आहे. मुस्लिमांच्या ऱ्हासाची कारणे आणि पाश्चात्त्य अभिसंस्कृती व संस्कृतीच्या यशाची कारणे स्पष्ट करणारे बेननबी यांचे संशोधन दाखवून देते की ऱ्हासाचे मूळ कुरआन किंवा इस्लाममध्ये नाही, तर ते मुस्लिमांमध्ये आहे. वसाहतवादाच्या परिणामांचे खरे चित्र आणि अभिसंस्कृतीला चालना देणारे घटक मुस्लिमांचा प्रश्न सोडवू शकतात आणि मुस्लिमांचे नवे पुनर्जागरण घडवून आणू शकतात.

हे पुस्तक बेननबी यांचा अभिसंस्कृतीविषयक दृष्टीकोनाचा आणि आधिसैद्धांतिकीकरण (Meta-Theorizing) पद्धतिशास्त्र वापरून मांडलेल्या तत्त्वांचा शोध घेते. तसेच बेननबी यांचा अभिसंस्कृतीबाबत आंतर-विद्याशाखीय दृष्टीकोन आणि त्याच्या मुळाशी असलेल्या संरचनेचे विश्लेषण करण्यासाठी उपलब्ध साधनांच्या पलीकडे जाते.अभिसंस्कृतीचे नियमन आंतर - बाह्य आणि सामाजिक - बौद्धिक घटक करत असतात आणि स्वतः अभिसंस्कृतीसाठी एक समीकरण तयार करता येते हा बेननबी यांचा सिद्धांत हे पुस्तक अधोरेखित करते.

बेननबीच्या मते, माणूस + माती + काळ = अभिसंस्कृती या समीकरणासाठी धर्म हा अतिशय महत्त्वाचा संप्रेरक आहे आणि मुस्लिम ऱ्हास उलटवण्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. बेननबींसाठी अभिसंस्कृतीच्या कोणत्याही प्रक्रियेत माणूस केंद्रीय शक्ती आहे आणि त्याच्याशिवाय इतर दोन्ही घटकांचे मोल उरत नाही.

मुस्लिमांनी त्यांची आध्यात्मिक स्थिती बदलल्याशिवाय ते समाजात लक्षणीय आणि दूरगामी अर्थपूर्ण बदल घडवून आणू शकत नाहीत हा बेननबी यांचा विश्वास कुरआनात ध्वनित झाला आहे. खचितच, जोपर्यंत लोक स्वतः त्यांच्यात बदल करत नाहीत, तोपर्यंत अल्लाह त्यांची स्थिती बदलत नाही. (कुरआन १३:११)

संशोधाकांच्या वर्तुळात अभिसंस्कृतींचा अभ्यास आणि वैश्विक बदल हे नेहमीच अग्रस्थानी राहिले आहेत. अनेक संशोधक आणि तज्ज्ञांनी

अभिसंस्कृतीच्या अभ्यासाचा फेरविचार करण्याचा आग्रह धरला आहे. इब्न खल्दून यांच्या नंतर जगातील पहिले मुस्लिम सामाजिक तत्त्ववेत्ते आणि सामाजिक शास्त्रज्ञ बेननबी यांनी मानवी समाज आणि अभिसंस्कृती चालवणारे वैश्विक नियम आणि मूलतत्त्वे शोधली, तसेच त्यांचे इतिहासातील स्थान निश्चित केले. मुस्लिम अभिसंस्कृतीच्या ऱ्हासाने त्यांना त्याची कारणे शोधण्यास आणि उपाय सुचवण्यास भाग पाडले. अर्थशास्त्र, राजकारण आणि विचारप्रणाली यांच्यातील द्विधास्थितीचे वर्णन करण्यापेक्षा त्यांनी अभिसंस्कृतीच्या विकासात संकल्पनांची संप्रेरक म्हणून भूमिका स्पष्ट केली.

इस्लाम व सामाजिक शास्त्रांच्या सखोल आकलनासह बेननबी यांनी वैश्विक परिप्रेक्ष्यातून मानवी समाजांचे कामकाज आणि संस्कृती व अभिसंस्कृतीतील विधायक बदल टिपले आहेत. त्यांनी अभिसंस्कृतीच्या चौकटीत समाजाचे प्रश्न सोडवण्याचा उद्देश बाळगला. वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक – ऐतिहासिक घटनांच्या अभ्यासातील हा आकलनक्षम घटक होय. ते म्हणतात, 'प्रत्येक लोकसमूहांचा प्रश्न हा एका अर्थाने त्यांच्या अभिसंस्कृतींचा प्रश्न असतो.'

बेननाबी यांचे तत्त्वज्ञान इस्लामच्या सखोल आकलनावर आधारित अन्वयार्थाची प्रणाली आहे. त्यांचा अभिसंस्कृतीच्या अभ्यासाचा आणि त्याच्या इतिहासातील प्रक्रियेविषयीचा दृष्टीकोन मुस्लिम अभिसंस्कृतीतील पेच समजण्यासाठी आणि त्याचे मूळ व त्यावरील उपाय शोधण्यासाठी मदत करतो. त्यांचे ऐतिहासिक, समाजशास्त्रीय प्रशिक्षण आणि त्यांची तात्त्विक दृष्टी यामुळे त्यांना युरोपीय अभिसंस्कृतीचे विश्लेषण करणे व मूळ विचारांची निर्मिती करणे आणि उम्माच्या क्षमतेच्या आणि मर्यादांचे विश्लेषण करणे शक्य झाले आहे.

बेननबी यांच्या अभिसंस्कृती विषयक दृष्टीकोनास आकार देणारे विविध घटक शोधणे हा या पुस्तकाचा उद्देश आहे. त्यासाठी त्यांची साधने, त्यांची पद्धती, संकल्पना व सिद्धांत आणि त्यांचा दृष्टीकोन व त्यांच्या प्रक्रियेचे विश्लेषण यांचा आधार घेणे गृहीत धरलेले आहे. अंतिम उद्देश समकालीन अभिसंस्कृती समजणे आणि त्याचे सामाजिक जीवनावरील प्रभाव समजून घेत निर्णय प्रक्रियेतील लोकांना अभिसंस्कृतीची अभ्यास चौकट प्रदान करणे आहे.

मुस्लिम जगतात १९ व्या शतकाच्या सुरुवातीपासून सर्वसमावेशक विश्लेषणाची पद्धत वापरून मागासलेपण दूर सारत मुस्लिम अभिसंस्कृतीला सक्रिय करण्याचे बौद्धिक प्रयत्न सुरू आहेत. हेच प्रयत्न बेननबी यांच्या आधिसैद्धांतिक दृष्टीकोनातून दिसून येतात. हा आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन इतिहासाचे तत्त्वज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि इब्न खल्दून यांच्या वारशाचा परिणाम आहे. हा दृष्टीकोन मुस्लिम जगत आणि अन्य अभिसंस्कृतीमधील वेगवेगळी अर्धद्विधास्थिती स्पष्ट करण्यासाठी आवश्यक आहे.

बेननबी यांच्या अभिसंस्कृतीची धारणा योग्यरित्या समजून घेण्यासाठी आपण जॉर्ज रित्झर यांचा आधिसैद्धांतिक दृष्टीकोन वापरूयात. तो समाजशास्त्रीय सिद्धांताचे स्तर व्यवस्थित उलगडणारा आहे. तो इस्लामी बौद्धिक आणि सांस्कृतिक चौकट म्हणजेच बेननबी यांच्या संकल्पनेच्या पायाभूत वर्तुळास व्यवस्थितरित्या सामावून घेतो. ग्रंथकर्ता आधिसैद्धांतिकतेचे पहिले स्वरूप वापरतो. या अभ्यासाचा हेतू बेननबी यांचा अभिसंस्कृतीचा सिद्धांत हा उपआधिसैद्धांतिकतेच्या चार पैलूंसह योग्यरित्या समजून घेणे आहे.

आधिसैद्धांतिकतेत सिद्धांतांचा अभ्यास केला जातो. जेणे करून विद्यमान सिद्धांतांचे सखोल आकलन व्हावे. त्याचे आंतर-सामाजिक अंग अभ्यासापुरते मर्यादित असून तो सामाजिक घटकांवर लक्ष केंद्रित करतो. ज्ञानानुभूतीच्या (Cognitive) घटकांवर नव्हे. तो स्थूल आकाराकडे वळतो, जेणे करून मोठ्या समाजाचे निरीक्षण करता येईल आणि त्याचा सैद्धांतिकीकरणावरील परिणाम पाहाता येईल. अर्थात सैद्धांतिकीकरणाची प्रक्रिया आणि इतर अनेक संस्थांमधील संबंध स्पष्ट करण्यावर जोर देत. बेननबींच्या बाबतीत हे पैलू बाह्य-सामाजिक घटक आणि त्यांच्या दृष्टीकोनाची रचना व विकास यांच्या संबंधावर लक्ष केंद्रित करते.

आंतरबौद्धिक पैलू हा बौद्धिक किंवा ज्ञानाच्या विषयांवर लक्ष केंद्रित करतो. त्याच्यासाठी अभिसंस्कृतीच्या अभ्यासाअंतर्गत पारंपरिक असलेले विषय प्रमुख असतात. त्यात, मुख्यतः ज्ञानाची रूपसरणी, विचारसरणी, बदलांचे स्वरूप आणि आधिसैद्धांतिकतेच्या विकासाची साधने यांचा समावेश होतो. तर बाह्यबौद्धिक पैलू वेगळ्या संशोधनात्मक गोष्टींकडे वळतो. त्यात, संकल्पना, साधने, धारणा आणि अभिसंस्कृतीच्या अभ्यासाचे सिद्धांत

यांचा समावेश असतो. बेननबींच्या बाबतीत या पैलूत कुरआनाचा प्रभाव, मुस्लिम जगतातील धार्मिक विचार, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, निसर्गविज्ञान, आणि अभिसंस्कृतीच्या अभ्यासाच्या क्षेत्राबाहेरील इतर बौद्धिक कार्य व त्याच्या दोन प्रभावी रूपसरणी यांचा समावेश होतो.

आधिसैद्धांतिकता ही विद्यमान सिद्धांतांना समजून घेणे, त्याचे परीक्षण करणे, समीक्षा करणे आणि ते अधिक सुधारणे यासाठी व्यवस्थित पद्धत प्रदान करते. आधिसिद्धांततज्ज्ञ व्यवस्थित सखोल, प्रसंगी सर्वसमावेशक अभ्यास करतात. समाजशास्त्रीय सिद्धांताची क्षेत्रे अभ्यासतात. आधिसैद्धांतिकता विद्यमान सिद्धांतांचे अधिक अनुरूप निरीक्षण करणे आणि नेमके विश्लेषण करणे शक्य करते.

या अभ्यासाच्या व्यापक पद्धतीत बेननबी यांचा अभिसंस्कृतीविषयक दृष्टीकोन समजण्यासाठी आधिसैद्धांतिकतेचे प्रारूप वापरून बेननबी यांचा दृष्टीकोन इब्न खल्दून आणि इतरांशी ताडून पाहिला आहे. या संशोधनात विश्लेषणाच्या मिश्र पद्धती वापरल्या आहेत. तीत ऐतिहासिक विश्लेषण, तौलनिक विश्लेषण आणि आशय विश्लेषण यांचा समावेश आहे. तुलनात्मक अभ्यासातून सदर लेखक बेननबी यांचा दृष्टीकोन आणि इतरांचा दृष्टीकोन यातील फरक व साम्य शोधू व समजू इच्छितो. आशय विश्लेषण पद्धत बेननबी यांच्या संकल्पना, गृहीतके, संज्ञा यांचा विचार करते. जेणे करून बेननबी यांनी व्यक्त केलेला विचार समजून घेणे, त्यांच्या दृष्टीकोनाखालील संरचना उजेडात आणणे, आणि त्यांच्या विविध संकल्पना व्यवस्था म्हणून आधिसैद्धांतिक आधाराने सखोल समजून घेणे शक्य होईल. मिश्र सामाजिक जगत समजून घेण्यासाठी सूक्ष्म – स्थूल सातत्य हे ज्ञानमीमांसेचे साधन म्हणूनही वापरले आहे.

बेननबी यांच्या अभ्यास चौकटीचे आणि त्यांच्या अभिसंस्कृती विषयक दृष्टीकोनाचे विश्लेषण करण्यासाठी मुख्य साधन म्हणून त्यांचे मूळ संशोधन ग्रंथ वापरले आहेत. त्यांनी त्यांची सर्व पुस्तके ‘मुश्किलात अल हझाराह (अभिसंस्कृतीच्या समस्या) नावाने प्रसिद्ध केले आहे. तसेच त्यांचे समाजशास्त्र आणि तिच्या विविध शाखा, इतिहासाचे तत्त्वज्ञान, मानव वंशशास्त्र, इतिहास व इतर सामाजिक शास्त्रांवरील लेखनही वापरले आहे. हे इतर लेखन लेखकाने दुय्यम साधने म्हणून वापरली आहेत.

प्रकरण पहिले

# अभिसंस्कृती: विविध संकल्पना आणि दृष्टीकोन

आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन अभिसंस्कृतीच्या संशोधनासाठी आणि सिद्धांतासाठी अधिक निर्मितीक्षम आहे. तो एखाद्या विषयाच्या अभ्यासात सर्व पैलू सामावून घेतो. त्यामुळे त्याची उपयुक्तता वाढते. अभिसंस्कृतीच्या संकल्पनेचा विकास अभ्यासताना आणि संपूर्ण इतिहासात त्याच्या विषयांचा दृष्टीकोन अभ्यासताना, तो अभिसंस्कृतीच्या अभ्यासाच्या क्षेत्रात प्रभावी रूपसरणी आणि विद्याशाखा ओळखण्यात मदत करतो.

अनेकविध अभिसंस्कृतींच्या बहुसांस्कृतिक व बहुभाषिक परंपरांमधून अभिसंस्कृतीच्या संकल्पनेचा उगम कसा झाला हे निश्चित करणे आव्हानात्मक आहे. खास करून पाश्चात्त्य आणि मुस्लिम अभिसंस्कृतींमध्ये. तसेच अभिसंस्कृतीच्या अनेकविध क्षेत्रांच्या अनेक व्यांख्यांवरील वादांमुळेही अडचणी उभ्या राहतात. बहुतांश संशोधक अभिसंस्कृती ही व्यापक सांस्कृतिक गोष्टीचे निदर्शक असल्याच्या मताशी सहमत आहेत. हंटिंग्टन अभिसंस्कृतीला इतिहास आणि काळाच्या ओघातील विकासाच्या संदर्भात पाहतो. तसेच अभिसंस्कृतीसोबत धर्म जोडतो. धर्माला अभिसंस्कृतीचा मध्यवर्ती बिंदू म्हणून जसे इब्न खल्दून, टॉयन्बी, बेननबी आणि इतर अभिसंस्कृतीच्या अभ्यासकांनी स्थान दिले, तशा प्रकारे तोही धर्माला स्थान देतो.

इस्लाम आणि पैगंबरांनी समाजातील अरब जमातींच्या सामाजिक संबंधांचा पाया बदलून त्याला संकल्पनेवर आधारित नागरी इस्लामी संस्कृती दिली. त्यात निरनिराळ्या सामाजिक स्तरांतील लोकांना आणि वांशिक संस्कृती समूहांना एकत्र केले. नवसमाज आणि नवअभिसंस्कृतीचे संस्थापक म्हणून पैगंबरांना भटक्या आणि जमात संस्कृतीच्या जागी नागर विकासाच्या गरजेची जाणीव झाली. त्यांचे शहर मदिना आरपार बदलून जाणाऱ्या अभिसंस्कृतीचे केंद्र होते.

मुस्लिम सांस्कृतिक परंपरेत अभिसंस्कृती ही संज्ञा पहिल्यांदा १४ व्या शतकातील इब्न खल्दून यांच्या लेखनात सापडते. त्यांनी पाश्चात्त्यांच्या सिव्हिलायझेशन शब्दाशी साम्य असणाऱ्या हझाराह आणि उम्रान या शब्दांची ओळख करून दिली. तसेच इल्म अल उम्रान म्हणजेच अभिसंस्कृतीचे शास्त्र

याचाही परिचय करून दिला. इब्न खल्दून यांनी अभिसंस्कृतीसाठी जेथे माणसे एकत्र घरे करून राहू व स्थिरावू शकतात, ही स्थिती आवश्यक मानली. त्यांची संकल्पना मानवी विकास प्रक्रियेतील रसायनांचे गतिमान स्वरूप अधोरेखित करते.

मुस्लिम बुद्धिजीवींमध्ये १९व्या शतकातील इस्लामी पुनर्जागरण आणि आधुनिक युरोपशी झालेल्या पहिल्या संघर्षानंतर अभिसंस्कृतीची संकल्पना अधिक विकसित झाली. हझाराहाची संकल्पना अरब जगतातील शास्त्रज्ञ आणि बुद्धिजीवींच्या वर्तुळात लोकप्रिय झाली आणि बेननबी त्याचे आद्यप्रवर्तक होते. त्यांनी तो शब्द अभिसंस्कृतीला संबोधण्यासाठी निवडला. मुस्लिम जगतातील इतर भाषांत त्याच्यासाठी मदानिय्याह किंवा त्या शब्दाचे वेगळे रूप वापरले.

मुस्लिम आणि पाश्चात्त्य हे दोन्ही परिप्रेक्ष्य अभिसंस्कृतीच्या पायाभूत घटकांवर सहमत आहेत. जसे, शहरी राहाणीमान, नागर व्यवस्था किंवा संस्था, स्थिर जीवन. भाषा आणि त्यातील अभिसंस्कृतीसाठी वापरलेले अनेक शब्द अभिसंस्कृतीचा अर्थ पोचवतात. अभिसंस्कृतीत नागर समाज, काही सरकारी व्यवस्था, काहीसे शिक्षण, परिसर आणि जीवन बदलण्याचे सामर्थ्य, विकसित खास कामकाज, सामाजिक नातेसंबंधाचे जाळे आणि श्रद्धेची व्यवस्था, ईश्वराची संकल्पना किंवा उच्चतम शक्तीची कल्पना यांचा समावेश असतो.

अभिसंस्कृतीच्या प्रमुख गुणांबाबत व्यापक सहमती असली तरी, परिप्रेक्ष्यात, पद्धतिशास्त्रात, विषयांवर लक्ष केंद्रित करण्याबाबत आणि संकल्पनांबाबत मतभेद आहेत. तत्त्वज्ञान, इतिहास, सामाजिक शास्त्रे यांच्यात प्रमुख स्वरूपांविषयी आणि मानववंशशास्त्र व समाजशास्त्राच्या उपस्वरूपां-बाबत नाना दृष्टीकोन आहेत. प्रस्तुत अभ्यास सर्वसाधारणपणे अभिसंस्कृतीचे मुद्दे, विशेषतः बेननबी यांची संकल्पना समजून घेण्यासाठी अभ्यासाची चौकट प्रदान करतो.

घटनांचे तर्कसंगत स्पष्टीकरण देण्याच्या प्रयत्नात इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचा उदय झाला. इतिहास अव्वल व्यवस्था आहे, जिथे गतकाळाच्या कृतींचा, घटनांचा आणि परिस्थितीचा अभ्यास केला जातो. तर इतिहासाचे तत्त्वज्ञान ही अभ्यासाची दुय्यम व्यवस्था आहे, जिथे वर उल्लेख केलेल्या विषयांच्या अभ्यासाचा अभ्यास केला जातो. त्याला आधिअभ्यास

म्हणता येईल. त्याचा थेट घटना, कृती किंवा प्रसंगांशी संबंध येत नाही. त्याऐवजी हा अप्रत्यक्ष अभ्यास गतकाळाची उत्तरे समजावून सांगण्याचे आणि विश्लेषण करून सांगण्याचे काम करतो. इतिहासाचे तत्त्ववेत्ते इतिहासाच्या प्रक्रियेबाबत सर्वसमावेशक दृष्टी बाळगतात.

इतिहासकार गतकाळ समजावून सांगण्याचा प्रयत्न करतात. ते समाज का बदलतो? कृती करणाऱ्यांची भूमिका, इतिहासातील नियती आणि ऐतिहासिक घडामोडीतील वैश्विक रूपसरणींचे स्वरूप यांचा शोध घेतात. इतिहासाच्या प्रक्रियेत विचारांच्या काही विद्याशाखा ईश्वरी प्रेरणेवर जोर देतात. इतर काही व्यक्तिगत किंवा आर्थिक आणि इतर प्रभावी घटकांवर जोर देतात. इतिहासाच्या पुरोगामी दृष्टीकोनात प्लेटो, हर्डर, हेगेल आणि इतर युरोपीय विचारवंतांनी ज्यू-ख्रिस्ती दृष्टीने पाहात काळ व इतिहासाची प्रगती सरळ रेषीय आणि ऐतिहासिक चक्रात पाहिली.

सामान्यतः अभ्यासाची एकात्म चौकट देणाऱ्या मान्य संकल्पनात्मक योजनेशिवाय जे जागतिक इतिहासाचा अभ्यास करतात, त्यांच्यापुढे तीन दृष्टीकोन असतात. एक, संस्कृतींची किंवा अभिसंस्कृतींची मालिका, जिच्यात सर्व संस्कृती (अभिसंस्कृती) एक सारख्या विकासाच्या रूपसरणी असतात. दुसरे वैकासिक मॉडेल. आणि तिसरे साधे समांतर इतिहास असलेले मानवजातीतील नानाविध लोक. मालिकांचे मॉडेल अधिक विकसित आणि इब्न खल्दून यांच्यासारख्या अभिसंस्कृतीच्या थोर अभ्यासकांच्या संशोधनकार्यातून उदयास आलेले आहे.

इतिहासाच्या तत्त्वज्ञानाची पारंपरिक रूपसरणी आणि त्याच्या अभिसंस्कृतीविषयक अनेकविध दृष्टीकोनांच्या तुलनेत सामाजिक शास्त्रांच्या रूपसरणी आता उदयास येत आहेत. मानववंशशास्त्र पहिले सामाजिक शास्त्र आहे, ज्याने मानवी अभिसंस्कृती व संस्कृतीचा उल्लेख केला. मानव वंशशास्त्रीय परंपरेत अभिसंस्कृती हा उच्चतम विकसित स्तर आणि व्यापक सांस्कृतिक ओळख आहे.

समाजशास्त्रज्ञ इतिहासाकडे वेगळ्या नजरेतून पाहतात. ऐतिहासिक समाजशास्त्र सुरुवातीला बदलांच्या प्रक्रियेचे विकसनशील मॉडेल तयार करणारे नव्हते. ते ऐतिहासिक घटनांचे, तथ्यांचे किंवा संस्थांचे सामाजिक पैलू

अभ्यासताना इतिहासावर लक्ष केंद्रित करते. या संदर्भाने एक व्यापक प्रमाणातील रसायन आणि दीर्घकालिक ऐतिहासिक आणि विकासाची उत्क्रांतिकारक प्रक्रिया म्हणून अभिसंस्कृती ही स्थूल समाजशास्त्राशी (Macro-Sociology) संबंधित आहे. इतिहासकार आणि इतिहासाच्या तत्त्ववेत्त्यांसारखी स्थूल समाजशास्त्रज्ञांना खात्री वाटते की, ते मानवी जीवनातील बदलांची अतिशय मूलभूत प्रक्रिया काळाच्या आणि विश्लेषणाच्या व्यापक वर्तुळात समजू शकतात.

आपल्या काळातील सर्वांत जास्त दबाव असलेल्या समस्या स्थूल समाजशास्त्रीय असल्याचे म्हणून सांगितले जाते. त्यांची उत्तरे शोधण्यासाठी स्थूल समाजशास्त्रीय सिद्धांताची आणि संशोधनाची गरज असल्याचे सांगितले जाते. व्यापक सामाजिक प्रवाहाच्या संदर्भाशिवाय अनेक सूक्ष्म समाजशास्त्रीय विकास आणि समस्या समजून घेता येत नाहीत किंवा सोडवता येत नाहीत. स्थूल समाजशास्त्राने, त्याच्या विश्लेषणावर लक्ष केंद्रित करणाऱ्या बाजूसह, सांस्कृतिक व्यवस्था, समाज आणि अभिसंस्कृतींच्या दीर्घकालिक प्रक्रियेच्या विश्लेषणातून मोठे रसायन अभ्यासण्याच्या कामी योगदान दिले आहे.

बदलांच्या समाजशास्त्राने एक एकक वापरत बदलांच्या पातळीचे वर्गीकरण करून अभिसंस्कृती आणि ऐतिहासिक बदलांच्या अभ्यासात योगदान दिले आहे. उदा. आकार (मग ते कुटुंब असो, संस्कृती असो वा अभिसंस्कृती असो वा जग). कालखंड (ऐतिहासिक, दीर्घकालिक, लघुकालिक), किंवा पैलू (सांस्कृतिक, बौद्धिक आणि अभिसांस्कृतिक).

अनुभवावर जोर देणाऱ्या सामाजिक शास्त्रांनी अधिक सैद्धांतिक आणि तात्त्विक असलेले प्रश्न टाळले आहेत. साहित्याने अभिसंस्कृती आणि तिची जटिलता व्यवस्थित अभ्यासासाठी आंतर विद्याशाखीय पद्धतिशास्त्राची गरज असल्याचे दाखवून दिले आहे. अभिसंस्कृतीच्या अनेक विध संकल्पना तिचे बहुआयामी स्वरूप आणि विद्यमान दृष्टीकोनांच्या मर्यादा स्पष्ट करण्यात मदत करतात. अभिसंस्कृतीचा सर्वसमावेशक अभ्यास करण्यात अपयशी ठरलेले इतर दृष्टीकोन सूचवतात की, अभिसंस्कृतीच्या निरनिराळ्या पातळ्या स्वतंत्ररित्या अभ्यासल्याने तिचे साकल्याने आकलन होत नाही. त्यामुळे वैश्विक परिप्रेक्ष्यात तिच्या संकल्पनेची बांधणी केली पाहिजे.

प्रकरण दुसरे

## बेननबी यांच्या अभिसंस्कृती विषयक दृष्टीकोनातील प्रमुख संकल्पना

मुस्लिम जगतातील पेचप्रसंगांच्या कारणांकडे दुर्लक्ष करत केवळ लक्षणांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या सुधारणावादी आणि आधुनिकतावादी प्रवाहांवर बेननबी यांनी टीका केली आहे. त्यांनी स्पष्ट सांगितले की, मुस्लिम जगतात पुनर्जागरणाची मशाल पेटवण्याचे प्रयत्न त्याच्या पेचप्रसंगाबाबत योग्य दृष्टीकोन तयार करत नाहीत. समस्येचे मूळ अल मुवाहिद युगातील मुस्लिम संस्कृतीत आहे. बेननबी म्हणतात, ऐतिहासिक प्रक्रियेने वसाहत होण्यास वाट दिली. मुस्लिम जगातील सद्यःस्थितीचे मुख्य कारण वसाहतीकरण नाही. परंतु वसाहत होण्याची आपली दुर्बलता अनेक दुय्यम कारणांपैकी एक आहे.

बेननबी यांची अभिसंस्कृतीची व्याख्या बहुघटकीय आहे. बेननबी यांनी अधोरेखित केले आहे की, अभिसंस्कृती समाजातील निर्णायक समस्यांना सामोरे जाण्यासाठी सामाजिक क्षमता सक्रिय करणे आणि मानवी जीवनातील नैतिक आणि भौतिक पैलूंमधील समतोल स्पष्ट करून सांगितला आहे. समाज मानवी क्रियाकलापांचे समर्थन इतिहासाच्या वर्तुळात करत असतो. त्यामुळे समाज हा अभिसंस्कृतीच्या प्रक्रियेत केंद्रीय शक्ती आहे.

बेननबी यांनी स्पष्ट केले की, मानवी समाजात जीवंतपणा आणण्यात आणि समतोल राखण्यात नैतिक व भौतिक घटक महत्त्वाचे आहेत; ते समाजात एकात्मता आणि एकता निर्माण करतात. त्यांनी अभिसंस्कृतीची व्याख्या तिच्या संरचना आणि सामाजिक अर्काच्या मार्फत केली आहे. ते म्हणतात, 'माणसे समूहात जगायचे कसे हे शिकतात आणि .. मानवी जीवन व्यवस्थित करण्याकामी संपर्क आणि सामाजिक संबंधांचे आवश्यक महत्त्व ग्रहण करतात. जेणे करून त्याची ऐतिहासिक कार्ये व जबाबदाऱ्या पूर्ण करता येतील.'

बेननबी यांच्यासाठी अभिसंस्कृती = माणूस + माती + काळ हे सूत्र अभिसंस्कृतीचे समीकरण मांडते. ते त्याचे घटक किंवा सामग्री संरचनात्मकरित्या निश्चित करते. हे कोणत्याही अभिसांस्कृतिक कृतीचे किंवा

उत्पादनाचे असलेले मूलभूत घटक स्पष्ट करतात की, अभिसंस्कृतीची समस्या तीन वर्गात विभाजित करता येते, माणूस, माती आणि काळ.

बेननबी सांगतात, माणूस निर्माण करत असलेल्या सगळ्या वस्तू किंवा जिन्नस या माणूस (इन्सान), माती (तुराब) आणि काळाचे (वक्त) परिपाक असतात. हे तीन घटक अभिसंस्कृतीची सुरुवात होण्यासाठी प्रत्येक समाजात मूलभूत म्हणून आढळतात. आपण जेव्हा माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची बांधणी, मातीचा वापर आणि वेळेचे नियोजन वैज्ञानिकरित्या स्पष्ट करतो, तेव्हाच अभिसंस्कृती विकासासाठी आवश्यक मानवी गरजांना सामाजिक सेवा आणि साह्य प्रदान करेल. या समीकरणात अभिसंस्कृतीसाठी माणूस अव्वल साधन आणि कोणत्याही अभिसंस्कृतिक प्रक्रियेत केंद्रीय शक्ती आहे. मानवी कारकांऐवजी त्याचा सामाजिक परिसर बदलू पाहणाऱ्या मुस्लिम जगतातील सुधारणा चळवळींवर बेननबी यांनी टीका केली आहे. ते म्हणतात, आपण माणसाला सुधारले पाहिजे. एकीकृत स्वरूपाच्या माणसासोबत अभिसंस्कृतीचा उदय होतो. तो समाजात त्याची भूमिका पार पाडण्यासाठी त्याची वैशिष्ट्ये आदर्शात बदलतो.

बेननबी यांच्या मते कल (तौवजिह) संकल्पना अभिसंस्कृतीच्या हालचालीत सौहार्द व हेतूत ऐक्य प्रदान करते, एकाच स्रोतातून सुरुवात करण्याच्या प्रयत्नातील संघर्ष टाळत एकाच उद्देशांकडे लक्ष केंद्रित करते. बेननबी यांनी संस्कृतीकडे माणसाला सामाजिक व्यक्तिमत्त्व म्हणून प्रभावित करणारा अव्वल घटक म्हणून तर, समाजाच्याकडे सर्व समावेशी संरचना म्हणून पाहिले. संस्कृतीची स्थिती ही अभिसंस्कृतीची दिशा आणि इतिहासात तिची नियती निश्चित करते.

बेननबी यांच्या समीकरणात तिन्ही घटकांचा समन्वय आणि त्यांच्या अभिसंस्कृतीच्या प्रक्रियेत दिशा देण्यासाठी धर्म आवश्यक आहे. इतिहासातील सर्व अभिसंस्कृती, कोणत्याही अपवादाशिवाय, धर्माच्या कल्पनांसह विकसित झाल्या. बेननबी यांच्या दृष्टीकोनात अभिसंस्कृतीच्या प्रक्रियेतील संप्रेरक म्हणून धर्म तोपर्यंत कार्य सुरू करू शकत नाही, जोपर्यंत माणूस, माती व काळ यांना एक सामाईक प्रकल्पात एकत्र करण्याच्या अभिसांस्कृतिक प्रक्रियेच्या काठाला तो लागत नाही. ते म्हणतात की,

समकालीन अभिसंस्कृतींनी माणूस, माती व काळ यांची मूळ मोट बांधत त्यांना धार्मिक संकल्पनांच्या पाळण्यात एकत्र आणले.

बेननबी समाजाच्या परिक्षेत्रांच्या (Realms) उत्पती व स्वरूपाविषयी चर्चा करतात. त्यांच्या मते, यात कोणतीही कृती तीन पैकी एका वर्गाशी संबंधित असते. वस्तू, व्यक्ती आणि कल्पना. या घटकांना समन्वयाची प्रक्रिया लागू केल्यास सर्व कृती, क्रियाकलाप आणि कार्ये माणसाची गोळाबेरीज असल्याचे दिसून येते. तसेच भौतिक किंवा साधनांची गोळाबेरीज, तसेच कल्पनांची गोळाबेरीज त्या कृतींमागे असल्याचे दिसते. मानवी क्रियांकलापांच्या गोळाबेरजेचा परिणाम असलेल्या क्रियाकलापांवर अभिसंस्कृतीचे साध्य संपूर्णपणे अवलंबून आहे.

अभिसंस्कृती व्यक्तीच्या परिक्षेत्रात एकात्म झालेल्या व्यक्तीपासून तिची प्रक्रिया सुरू करत समाजाच्या क्रियाकलापांमध्ये बदलते. बेननबी यांचे 'व्यक्तींचे परिक्षेत्र' हे विशिष्ट समूहांतील विधायक किंवा विघातक संबंधांची गोळाबेरीज दाखवते आणि त्या संबंधांच्या महत्त्वावर जोर देते. परिणामतः समाजाची नियती तिच्या अभिसांस्कृतिक प्रक्रियेत स्वभावावर किंवा व्यक्तींच्या परिक्षेत्राने बनवलेल्या तिच्या व्यवस्थेतील संबंधांवर आधारित असते.

बेननाबींच्या मते, कल्पनांचे परिक्षेत्र पवित्र किंवा निधर्मी स्रोतांपासून येणाऱ्या प्रभावी कल्पना आणि मूल्ये व नीतितत्त्वांकडे समजाला कल व दिशा देण्याचे काम करणारी रूपसरणी यांपासून बनलेली असते. मुस्लिम अभिसंस्कृतीत प्रभावी कल्पना कुरआन आणि सुन्नाह (प्रेषित परंपरा) येथून आलेल्या आहेत. बेननबी मानतात की, अभिसंस्कृती जिवंत व गतिशील कल्पनांचा परिपाक असून त्या अभिसंस्कृतीपूर्व समाजाला इतिहासात प्रवेश करण्यास आणि तिच्या आदिम स्वरूपातील कल्पनांच्या व्यवस्थेची बांधणी करण्यासाठी प्रेरित करतात.

कल्पनांचे परिक्षेत्र समाजाला संस्कृतीपासून वेगळे करत अभिसंस्कृती घडण्यासाठी दृष्टी आणि अस्सल रूपसरणी देते आणि सर्व व्यक्ती अनुकरण करू शकतील असे आदिम स्वरूप देते. समाजाला इतिहासात त्याची विधायक भूमिका पार पाडण्यासाठी कल्पनांचे परिक्षेत्र महत्त्वाचे आहे. वस्तूंचे परिक्षेत्र अभिसांस्कृतिक प्रक्रियेत साधने, माध्यम, नैसर्गिक संसाधने आणि

गरजेची साधने देते. ते समाजाच्या ऐतिहासिक स्थित्यंतरासाठी भौतिक गरजांची पुर्तता करते आणि अभिसांस्कृतिक प्रक्रियेत समाजाची स्थिती स्पष्ट करते.

बेननबी सांगतात की, या परिक्षेत्रांमध्ये सामाजिक संबंधांच्या जाळ्याशिवाय कोणतीही ऐतिहासिक क्रिया घडू शकत नाही. ही संकल्पना निसर्ग आणि समाजाची गतिशीलता ही सामाजिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातून समजून घेण्याशी अगदी जोडली गेलेली आहे. तिन्ही परिक्षेत्रातील द्वंद्वात्मक संबंध हा सामाजिक संबंधांच्या जाळ्याचे अस्तित्व दाखवतो आणि त्याच्या असण्यावर जोर देतो. हे परिक्षेत्र अभिसंस्कृतीची बांधणी करू पाहणाऱ्या कोणत्याही ऐतिहासिक क्रियेसाठी तिन्ही परिक्षेत्रांतील आवश्यक किमान संबंध उपलब्ध करते. तिन्ही परिक्षेत्रे सामाजिक संबंधाच्या जाळ्याशिवाय काम करू शकत नाहीत.

मुस्लिम समाजाची पुनर्बांधणी, तिच्या संस्कृतीचे पुनरुत्थान, आणि तिची ऱ्हासाच्या काळातील तिच्यातील नकारात्मक घटकांपासून सुटका कशी करता येईल हा बेननबी यांचा प्रामुख्याने चिंतनाचा विषय आहे. त्यामुळे ते स्वातंत्र्याच्या समाजशास्त्राच्या गरजेवर जोर देतात. या नव्या समाजशास्त्राचा आरंभ बिंदू समाजाची पुर्नव्याख्या करण्याचा आहे. ते जोर देऊन सांगतात की, नैसर्गिक समाज स्थितिशील समाज आहे, तर ऐतिहासिक समाज गतिशील आहे. सर्व प्रकारच्या ऐतिहासिक समाजांत काही वैशिष्ट्ये सारखी असतात. सामाजिक संबंधाचे जाळे समाजाच्या सदस्यांना जोडते आणि या सदस्यांच्या क्रियाकल्पनांना समाजाचे खास ध्येय व मुख्य काम असलेल्या सामूहिक कार्याला पूर्ण करण्यासाठी दिशा देते.

प्रकरण तिसरे

## बेननबी यांची अभिसंस्कृतीच्या स्थित्यंतराची व्याख्या

बेननबी यांनी अभिसंस्कृतीच्या चक्रांचा आढावा घेतला; तो असा की, घटनांच्या असंख्य मालिका अभिसंस्कृतीच्या ठरलेल्या वाटेने जात आहेत. त्यात सारखेपण आहे, मात्र, त्या एक सारख्या नाहीत, हे निरीक्षण त्यांनी नोंदवले. त्यांनी स्पष्ट केले की, विशिष्ट अभिसंस्कृती चक्रीय आहेत आणि त्या ठरावीक दिशेने मार्गक्रमण करत असतात. प्रत्येक सामाजिक समूह त्याचा स्वतःचा ठसा अभिसंस्कृतीवर उमटवत असतो. प्रत्येक अभिसंस्कृतीची वेगळी ओळख आहे. अभिसंस्कृती या त्यांच्या त्यांच्या खास मनो-कालिक स्थितीबाबत वेगवेगळ्या असतात. मात्र, इहितासात त्यांचे सर्वसाधारण स्वरूप सारखे असते.

बेननबी सांगतात की, अभिसंस्कृती तिचे मूलभूत घटक आणि धार्मिक संकल्पनांची चौकट यांच्यात समन्वय घडवते तेव्हा ती तिच्या चक्राला सुरुवात करते. मूलभूत घटक जेव्हा गतिशील संबंधांत निष्क्रिय होतात, तेव्हा अभिसंस्कृती संपू लागते. प्रत्येक अभिसंस्कृती इतिहासात तिची भूमिका पार पाडते. अगदी तिचा ऱ्हास होईपर्यंत, विकास थांबेपर्यंत आणि मानवतेस पुढे नेण्याचे कार्य थांबेपर्यंत ती तिची भूमिका आदा करत असते. दुसरी अभिसंस्कृती इतिहासातील तिचा चक्रक्रम घेण्यासाठी नव्याने सुरुवात करते. ही अभिसंस्कृतीच्या स्थित्यंराची प्रक्रिया इतिहासात चक्रीय रसायनास बल देते.

बेननबी यांनी असा युक्तीवाद केला की, कोणताही समाज अभिसंस्कृतीत बदलण्यासाठी त्याच्या अभिसांस्कृतिक प्रक्रियेच्या ठरलेल्या स्वरूपातून जात असतो. अभिसंस्कृतीपूर्व अवस्था संपवल्यानंतर, समाज त्याच्या दुसऱ्या चरणात प्रवेश करतो, म्हणजे अभिसंस्कृतीत होतो. या दुसऱ्या चरणात समाज तीन टप्प्यांतून जातो, आत्मा (आध्यात्मिक), कारण (कार्यकारणभाव) आणि स्वयंप्रेरणा (निसर्गदत्त प्रेरणा).

चक्रीय सिद्धांत सामाजिक समस्या मांडू शकतो. अर्थात इतिहासाच्या चक्रातील आमची स्थिती निश्चित करून. तो ऱ्हासाची कारणे समजू शकतो आणि प्रगतीची सुप्तक्षमता ओळखू शकतो. चक्रीय

संकल्पना अभिसंस्कृतीची स्थित्यंतरे स्पष्ट करू शकते. ती माणसांचे सामाजिक अस्तित्व समजून घेणे आणि त्याचे विश्लेषण करण्यासाठी मूलभूत चौकट प्रदान करणारी आहे. बेननबी यांनी ही संकल्पना इब्न खल्दून यांच्याकडून घेत विकसित केली आहे. ते सुचवतात की, मानवी अभिसंस्कृती एका बिंदूपासून सुरुवात करते आणि ठरलेल्या स्वरूपानुसार मार्गक्रमण करते. शेवटच्या टप्प्यात अभिसंस्कृतीची मूल्ये बदलतात आणि पुढे जाऊन दुसरी मूल्ये जागा घेतात. हा बदल चक्रक्रमाच्या अस्तित्वाला दुजोरा देतो.

बेननबी मानत की, चक्र क्रमात तीन टप्प्यांचे स्थानांतर अचानक किंवा स्वयंस्फूर्तीने होत नाही. ते माणसे आणि समाज यांच्यावर अतिशय खोलवर रूपांतर आणि बदल घडवून आणतात. माणूस, माती आणि काळ या तिन्ही घटकांच्या ऐतिहासिक सेंद्रीय समन्वयाची (एकजीव) सुरुवात करण्यासाठी अपवादात्मक स्थितीची गरज असते. हे समन्वयन समाजाच्या ऐतिहासिक कार्याची सुरुवात करणारा योगायोग घडवते आणि ते समाजाच्या जन्माची खूण ठरते. या क्षणी सामाजिक मूल्यांना अद्याप वास्तवाचे मूर्त रूप आलेले नसते.

धार्मिक संकल्पना प्रत्येक अभिसंस्कृतीच्या आरंभी तिच्यात स्थित्यंतर घडवण्यासाठी बीजारोपण करते. त्यानंतर आध्यात्मिक टप्पा व्यक्ती आणि समाजाचे जीवन व्यापायला सुरुवात करतो. या टप्प्यात सामाजिक संबंधांचे जाळे दाट असते आणि विखुरलेली माणसे एकात्मभावाने एकमेकांशी जोडली जाण्यास सुरुवात होते. ती विलग राहात नाहीत. अशा स्थितीतील प्रक्रिया निसर्गदत्त प्रेरणांचे संकलन धार्मिक संकल्पनांच्या गरजेनुसार कार्यप्रवण संबंधांमध्ये करते. या नव्या स्थितीत प्रत्येक व्यक्ती आध्यात्मिक नियमांनुसर जीवनात गुंतून जाते.

सामाजिक संबंधांचे जाळे त्याच्या परिपूर्ण अवस्थेला पोचते, जिथे त्याच्या धार्मिक संकल्पना विस्तारत राहतात. त्याच वेळी अभिसंस्कृती तिच्या नव्या समस्यांशी आणि गरजांशी दोन हात करत नवी व्यवस्था आणि नवे निकष जन्माला घालते. समाजाच्या विकासानंतर, नव्या भौतिक समस्यांच्या उदयाने आणि अभिसंस्कृतीच्या विस्ताराने आध्यात्मिक टप्पा मागे पडतो. आणि अभिसंस्कृती तिच्या दुसऱ्या कार्यकारण टप्प्यात पोचते. आता कार्यकारणभाव सर्व क्रियाकलापांचे नियंत्रण करतो आणि अभिसंस्कृती

इतिहासात विकसित होत राहाते. अभिसंस्कृती स्थित्यंतर करून कार्यकारण टप्प्यात पोचल्याने समाज संबंधांच्या उत्तम विकसित जाळ्याचा लाभ घेतो, पण काही दोषांचा त्रासही अनुभवतो. मानसशास्त्रीय भाषेत सांगायचे तर, सामाजिक कार्ये पूर्ण करत असताना व्यक्तीचेतिच्या प्रेरणांवर स्वतःचे पूर्ण नियंत्रण राहात नाही. समाजाच्या काही शक्ती आणि प्रेरणा निष्क्रिय होतात आणि काहींचा ऱ्हास सुरू होतो.

अभिसंस्कृतीच्या संपूर्ण इतिहासात तिच्या उत्क्रांतीची प्रक्रिया वैयक्तिक मानसशास्त्र आणि वैयक्तिक वागणुकीत तडजोड थांबवणारी समाजाची नैतिक संरचना यांच्यातून प्रकट होते. जेव्हा तर्कसंगत शक्तींचे व्यक्तींच्या क्रियाकलापांवरील नियंत्रण हरवणे सुरू होते, तेव्हा अभिसंस्कृती नव्या परिस्थितीला तोंड देते. तिथे व्यक्तींच्या सहजप्रेरणा आध्यात्मिक व तर्कसंगत शक्तींवर वरचढ ठरतात. अभिसंस्कृती तिच्या उत्तर अभिसंस्कृती टप्प्यात प्रवेश करते आणि तिची मूल्ये माणूस, माती आणि काळ यांच्या नव्या समन्वयात बदलतात. या तिसऱ्या टप्प्यात सामाजिक संबंधांचे जाळे विरते आणि धार्मिक संकल्पना किंवा समाजाचे व्यक्तीच्या निसर्गदत्त प्रेरणांवर नियंत्रण उरत नाही. अराजकता व कायदाहीन स्थिती वरचढ ठरते. जसजसा आत्मा विसरला जातो, तसतशा निसर्गदत्त प्रेरणा मुक्त होत जातात.

निसर्गदत्त प्रेरणा जेव्हा पूर्णपणे मुक्त होतात, तेव्हा माणसाची नियती त्या प्रेरणांच्या प्रभावाखाली येते. अभिसंस्कृतीचा तिसरा टप्पा सुरू होतो आणि धार्मिक संकल्पना त्यांच्या सामाजिक उद्देशाची पूर्तता करणे थांबवतात. परिणामी, समाजाचे विघटन होते आणि अभिसंस्कृतीच्या चक्राचा शेवट होतो. आत्म्याच्या प्रेरणा संपुष्टात येतात, त्यासोबत तर्कसंगत कामकाजही थांबते.

बेननबी यांनी सांगितले की, अभिसंस्कृती या चक्राने जोडलेल्या असतात. त्याची सुरुवात धार्मिक संकल्पनेने होते. तर आध्यात्मिक व कार्यकारण शक्तीपेक्षा अन्य शक्ती वरचढ ठरू लागल्या की शेवट होतो. त्यांच्या मते, अभिसंस्कृतीचे हे पूर्ण चक्र, त्याच्या तिन्ही टप्प्यांसह, अभिसंस्कृतीची चैतन्यमय ऊर्जा दर्शवते. तसेच तिचे एका स्थितीतून दुसऱ्या स्थितीत बदलणेही दर्शवते. अभिसंस्कृतीच्या उत्क्रांतीचा प्रत्येक टप्पा समजून घेतल्यास आणि या टप्प्यांची वैशिष्ट्ये समजून घेतल्यास विकास आणि

उत्क्रांतीची सर्वसाधारण चौकट आपल्या लक्षात येते.

बेननबी यांच्या समाजांच्या वर्गीकरणानुसार मानवी समाज त्याच्या जीवनात एका बिंदूवर स्वतःला जखडून ठेवत नाही. त्याऐवजी तो त्याच्या विकासाच्या मानसशास्त्रीय मूल्यांनुसार एका स्थितीतून बदलून दुसऱ्या स्थितीत जात असतो. म्हणून समाजाचा टप्पा, तिचे संबंधित प्रश्न आणि तिचे यश समजून घेण्यासाठी विकासाच्या आसावरील समाजाचे स्थान समजणे अत्यावश्यक आहे.

बेननबी सांगतात, विकासाचे टप्पे सांगणाऱ्या आसावर ऐतिहासिक समाजाचे निश्चित स्थान असते. इतिहास तीन टप्प्यांचे अस्तित्व सांगतो. अभिसंस्कृतीपूर्व समाज, अभिसांस्कृतिक समाज आणि अभिसंस्कृती-नंतरचा समाज. प्रत्येक समाज कोणत्याही काळात या तीनपैकी कोणत्याही एका टप्प्यात असतो आणि त्याच्या खास मूल्यांवर आधारित वैशिष्ट्ये धारण केलेला असतो. अभिसंस्कृतीचे विषय समजून घेण्यासाठी बेननबी इतिहास, समाजशास्त्र व मानसशास्त्र यांच्या अभ्यास पद्धतीवर जोर देतात. विद्यमान मुस्लिम जगाची वैशिष्ट्ये शोधण्यासाठी त्यांनी समाजाचा ऐतिहासिक प्रवास स्पष्ट करण्यासाठी त्यांनी मानसशास्त्रीय अन्वयार्थ वापरला आहे.

अभिसंस्कृतीपूर्व समाजात प्रत्येकजण अभिसंस्कृतीच्या चक्रात प्रवेश करण्यासाठी तयार अशा स्वरूपाचा नैसर्गिक मनुष्य (Homonatura) आहे. तसा अरब बेदोइन (Arab Bedouin) समाज हा पैगंबरांच्या काळात अभिसंस्कृतीच्या चक्रात प्रवेश करण्यासाठी तयार होता. अभिसंस्कृतीपूर्व समाजाला अभिसांस्कृतिक घटकांना चालना देण्याऱ्या शक्तीची गरज असते. समाजात प्राथमिक घटक (माणूस, माती व काळ) असले तरी ते धार्मिक संकल्पनेशिवाय गतिहीन असतात. धार्मिक संकल्पनेच्या चौकटीत माणूस, माती व काळ यांच्यात गतिशील देवाण-घेवाण झाल्याशिवाय समाज त्याची अभिसांस्कृतिक प्रक्रिया सुरू करत नाही. किंवा मानसिक-सामाजिक बदलांना सुरुवात होत नाही.

व्यक्ती आणि समाजाचा मानसिक - सामाजिक विकास अभिसांस्कृतिक हालचालींना वाव देतो. कारण, समाजाच्या क्षमता

सामाजिक प्रकल्पास बांधील असतात. जेव्हा अभिसांस्कृतिक समाज स्वतःचे ध्येय गाठण्यासाठी स्वतःला बदलू पाहतो, तेव्हा त्याची अभिसंस्कृती उदयास येते. अभिसांस्कृतिक टप्पा समाजाची एकवटण्याची आणि स्वतःची वैश्विक दृष्टी आणि संस्कृती विकसित करण्याची पात्रता दर्शवतो. माणूस अधिसांस्कृतिक प्रक्रिया सुरू करण्याची तयारी करतो, तेव्हा सामाजिक संबंधांचे जाळे मजबूत असते. या परिस्थितीत समाज त्याच्या अभिसंस्कृतीचे संरक्षण करू शकतो आणि त्याच्या विकासाची गती राखू शकतो. या स्थितीत सर्व व्यक्तीना समाजाकडून संरक्षणाला लाभ मिळतो आणि समाज त्याच्या अभिसांस्कृतिक प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करत असतो.

समाज जेव्हा उत्तर अभिसंस्कृतीच्या वळणावर पोचतो, तेव्हा तो गतिहीन होतो, अभिसंस्कृतिक क्षमता संपून जातात आणि ऱ्हास सुरू होतो. परिणामी, धार्मिक संकल्पना अभिसांस्कृतिक मूल्यांचे समन्वयन थांबवते आणि सामाजिक संबंधांचे जाळे कमजोर व्हायला लागते. पण, अजून त्याच्या भाळी पाडाव लिहिला गेलेला नसतो. अभिसंस्कृतीची दुसरी प्रक्रिया समाजाला या नियतीपासून रोखू शकते आणि त्याच्या ऱ्हासाच्या मार्गाची दिशा बदलू शकते. एकदा का समाज त्याची सांस्कृतिक चौकट हरवून बसतो तेव्हा तिच्या संकल्पनांचे वर्तुळ अराजकतेच्या स्थितीत प्रवेश करते आणि तिची संस्कृती अभिसंस्कृतिक प्रक्रियेत राहात नाही. विद्वानांमधील अभिसंस्कृतीच्या टप्प्यांबाबत गोंधळ आणि तिच्या वैशिष्ट्यांबाबत असलेले गैरसमज बेननबी यांनी उलगडून दाखवले आहेत. टप्प्यांचा गोंधळ समाजाच्या प्रश्नांची उकल करणे गुंतागुंतीचे बनवतो.

समाज तिसऱ्या टप्प्यात मूळ विचार हरवून बसतो. इतर टप्प्यांच्या तुलनेत सुसंगत असे त्याचे वर्तन राहात नाही. बेननबी यांनी मुस्लिम जगाला अभिसंस्कृतीच्या या तिसऱ्या टप्प्यात ठेवत त्याच्या सद्यःस्थितीतील समस्यांवर इलाज शोधण्याचा प्रयत्न केला आहे. समाजाने त्याच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी त्याचे अस्सल तत्त्व आणि गतिशील वर्तन परत मिळवणे आवश्यक आहे. त्यासाठी समाजाने उत्तर अभिसंस्कृतिक माणसाच्या वैशिष्ट्यांपासून मुक्त असा नवा मनू घडवला पाहिजे. त्यानंतर तो धार्मिक संकल्पनांना सामावून घेत माती आणि काळाच्या नव्या समन्वयात प्रवेश करेल. बेननबी यांनी इतिहासातील आपले स्थान ओळखणे आणि

मागासलेपणाची वा विकासाची कारणे समजून घेण्याची गरज व्यक्त केली आहे. सामाजिक समस्या ऐतिहासिक असतात. समाजाच्या विकासातील एका टप्प्यातील जे काही अनुकूल आहे, ते त्याच्या वेगळ्या टप्प्यात हानिकारक ठरू शकते.

बेननबी यांनी समाजाच्या उत्क्रांतीकडे मानसशास्त्रीय – समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून पाहिले. त्यातून समाजाच्या विकासाच्या काळाचे तीन मानसशास्त्रीय – समाजशास्त्रीय टप्पे सांगितले आहेत. वस्तूंचे युग, लोकांचे युग आणि संकल्पनांचे युग. त्यांनी मानवी वर्तुळ, वस्तूंचे वर्तुळ आणि संकल्पनांचे वर्तुळ यांच्यात द्वंद्वविकासी संबंध असल्याची सर्वसाधारण कल्पना मांडली. ती तीन युगांची संकल्पना अर्थपूर्ण बनवते. बेननबी यांनी सांगितले की, प्रत्येक समाजाचे त्याचे स्वतःचे जटिल सांस्कृतिक विश्व असते. तिथे समाजाच्या समन्वयाच्या कृतीत वस्तू, लोक आणि संकल्पना यांचे वर्तुळ एकमेकांत गुंफलेले असतात. नेहमीच कोणतेतरी एक वर्तुळ प्रमुख असते.

समाज त्याच्या पहिल्या टप्प्यात वस्तूंच्या क्षेत्राने निश्चित केलेल्या निकषांनुसार निर्णय करतो आणि निवाडे करतो. निवाड्यांचे स्वरूप व गुणवत्ता माणसाच्या आदिम गरजा आणि वस्तूंच्या क्षेत्राच्या आधारानुसार असते. बेननबी सांगतात की, मानवी समाज त्याच्या पूर्वअभिसंस्कृती काळात आणि उत्तरअभिसंस्कृती काळात वस्तूंचे युग अनुभवतो. ते आजच्या मुस्लिम समाजाला मानसशास्त्रीय, नैतिक, सामाजिक व बौद्धिक आणि राजकीय पातळीवर प्रभावित करते. संस्कृती वस्तूंभोवती केंद्रित होते, तेव्हा मानसशास्त्रीय आणि नैतिक पातळीवर मूल्याच्या परिमाणात वस्तू वरचढ असते. निवाडा गुणात्मकऐवजी संख्यात्मक असतो आणि सगळे काही वस्तूच्या परिमाणात मोजले जाते, मूल्याच्या परिमाणात नाही.

दुसऱ्या टप्प्यात समाज मानवी उदाहरण किंवा परिमाणानुसार त्याचे निवाडे निश्चित करतो. यासाठी वस्तूंच्या वर्तुळाऐवजी मानवी वर्तुळातून परिमाण स्वीकारतो. या टप्प्यात वस्तूच्या वर्तुळाची जागा मानवी वर्तुळ घेते आणि तेथूनच संकल्पनांचा स्वीकार केला जातो. इस्लामपूर्व अरबांचा जाहिली (अज्ञान) समाज याचे उदाहरण असल्याचे बेननबी सांगतात. तो

समाज जनजातीय सीमांमध्ये होता आणि मानवी वर्तुळातील संकल्पना त्याच्या केंद्रात होत्या. सध्याचा मुस्लिम समाज वस्तूंचे वर्तुळ आणि मानवी वर्तुळ यांच्या एकाधिकार शाहीच्या मध्यात आहे. बेननबी यांच्या मते ही स्थिती हानिकारक आहे, विशेषतः नैतिक आणि राजकीय पातळीवर नुकसानकारक आहे.

लेखकाच्या मते, इतिहासात समाजाची स्थितिगती पाहण्यासाठी तीन युगांची संकल्पना महत्त्वाचे साधन आहे. समाजाचा काळ भरभराटीचा आहे किंवा ऱ्हासाचा आहे हे पाहण्यासाठी, त्याच्या ठरावीक काळातील अग्रभागी असलेली त्याची मूल्ये पाहण्यासाठी ही महत्त्वाचे साधन आहे. समाजाची कार्ये सर्वसमावेशक क्रियाकलापाच्या संदर्भाने पाहिली पाहिजेत. जिथे वस्तूंचे वर्तुळ इतर दोन, मानवी आणि संकल्पनांच्या, वर्तुळात मिसळून जाते. एक वर्तुळ नेहमीच इतर दोन वर्तुळांपेक्षा प्रभावी ठरत असते. त्यावरून एका समाजाचे विचार आणि वर्तनाच्या बाबतीत दुसऱ्या समाजापासूनचे वेगळेपण सांगता येते.

तीन युगांची संकल्पना समाजाची मानसशास्त्रीय प्रगल्भता पाहण्यासाठी ही परिमाण म्हणून वापरता येते. पूर्ण इतिहासात समाजाच्या अभिसांस्कृतिक प्रक्रियेची दिशा, त्याच्या क्रियाकलापांचे संघटन आणि त्याच्या मूल्यांचे एका स्थितीतून दुसऱ्या स्थितीतील जाणे हे ही पाहण्यासाठी परिमाण म्हणून वापरता येते. तसेच एका वर्तुळाचा अन्य वर्तुळांवरील प्रभाव समाजाची ऐतिहासिक क्षणातील स्थिती दाखवतो. युग हे विकासाच्या कोणत्याही बिंदूवरील समाजावर असलेली प्रभावी आणि परिणामकारक सामाजिक मूल्ये आणि सांस्कृतिक वातावरण दाखवून देते.

बेननबी यांनी मुस्लिम जगाला पूर्वअभिसंस्कृतिक समाजाच्या टप्प्यात ठेवले आहे. या टप्प्यात ते नव्या अभिसंस्कृतिक प्रक्रियेत प्रवेश करण्यासाठी संघर्षरत आहे. त्यांनी इतिहासातील अभिसंस्कृतिक प्रक्रिया समजून घेण्यासाठी तिच्या अनेक पातळीवरील विश्लेषण करत अभिसंस्कृतीच्या स्थितिगतीचा अन्वयार्थ लावला आहे. त्यांची चक्रीय संकल्पना, तीन टप्पे आणि तीन युग हे त्यांनी एकाच रसायनाचे बहुपातळीवरील केलेले विश्लेषण आहे.

बेननबी म्हणतात की, अभिसांस्कृतिक प्रक्रियेत समाजाचा विकास सामाजिक संबंधांच्या जाळ्यात गुणात्मक आणि संख्यात्मक दृष्ट्या नोंदवलेला असतो. तो त्याच्या इतिहासातील समाजाचे टप्पे दाखवतो. कोणतीही अभिसांस्कृतिक प्रक्रिया तिची तीन क्षेत्रे किंवा वर्तुळ तयार होण्यापूर्वी सुरू झालेली असते. मानवी क्षेत्र किंवा वर्तुळ हे सामाजिक संबंधांचे जाळे तयार होण्यासाठी पूर्व अट ठरते. संकल्पना आणि वस्तूंचे वर्तुळ अद्याप साधारण असताना समाज कार्यरत असतो. त्यानंतर मानवी वर्तुळ बदलते आणि नव्या व्यवस्थेला सामावून घेते. इतर दोन्ही वस्तू आणि संकल्पनांचे वर्तुळ अद्याप प्राथमिक अवस्थेत असताना सामाजिक संबंधांचे जाळे काम करू लागते.

संकल्पनांचे वर्तुळ हे सामाजिक संबंधांचे जाळ्याशी मजबुतीने जोडलेले असताना समाज संरक्षणाची भूमिका चांगल्या रितीने पार पाडत असते. समाज पुनर्बांधणीचे काम हाती घेतो. हे सामाजिक संबंधांच्या जाळ्याशिवाय शक्य नसते. अभिसंस्कृतीचा विकास किंवा ऱ्हासाचे समर्थन एकटे संकल्पनांचे वर्तुळ करू शकत नाही. त्याच्यासाठी या वर्तुळाने सामाजिक संबंधांच्या जाळ्याशी जोडले जाणे आवश्यक असते. समाजाचा इतिहास हा धार्मिक संकल्पनेने सुरू झालेल्या सामाजिक संबंधाच्या जाळ्याच्या इतिहासाशिवाय दुसरे काहीही नाही.

प्रकरण चौथे

## बेननबी यांच्या अभिसंस्कृती विषयक दृष्टीकोनाची मुळे : अंतर्गत सामाजिक पैलू

या प्रकरणात रित्झर यांची अंतर्गत व सामाजिक पैलूंची व्याख्या वापरून त्या घटकांचा बेननबी यांच्या दृष्टीकोनावरील प्रभाव यावर लक्ष केंद्रित केले आहे. बेननबी यांच्या चरित्रची माहिती त्रोटक आहे आणि आत्मचरित्र केवळ १९०५ ते १९३९ पर्यंतचीच माहिती देते. उर्वरित जीवनाची माहिती खूप कमी साधनांत आली आहे. अर्थात त्यांच्या पुस्तकांतून आणि त्यांच्या समकालीन सहकाऱ्यांच्या लिखाणात आणि त्यांच्या काळातील ऐतिहासिक नोंदींतून मिळते.

मलिक बेननबी यांचा जन्म पूर्व अल्जेरियाच्या एका गरीब कुटुंबात १९०५ मध्ये झाला. इस्लामी वातावरणाने त्यांचे व्यक्तिमत्त्व घडवले. त्यानेच अल्जेरियन मुस्लिमांच्या संस्कृती व अभिसंस्कृतीवरील वासाहतिक दबावापासून त्यांचे संरक्षण केले. बेननबी म्हणतात, आजीच्या सश्रद्ध कथांनी अजाणतेपणी माझे व्यक्तिमत्त्व विकसित केले. त्या सर्वांतून मला उमजले की, इस्लामी मूल्ये आणि नैतिकतेच्या शीर्षबिंदूत आशीष आहे.

बेननबी यांनी फ्रेंचांच्या राजवटीत स्वतःच्या कुटुंबासह अनेक स्थानिक कुटुंबांचे पूर्वेकडील अरब देशांत झालेले एकत्रित स्थलांतर पाहिलेत. वसाहतवादाच्या निषेधातील या चळवळीने अल्जेरियाची आर्थिक आणि सामाजिक घडी खूप विस्कटून टाकली. पारंपरिक इस्लामी वातावरणाचा ऱ्हास झाला, पारंपरिक जीवनाचा ऱ्हास झाला. सामूहिक सहअस्तित्व धोक्यात आले. यावरून सूक्ष्मस्तरावर कुटुंब आणि स्थूलस्तरावर समाजासाठी सामाजिक संबंधाच्या जाळ्याचे महत्त्व बेननबी यांच्या लक्षात आले.

मुस्लिम अभिसंस्कृतीच्या पडत्या काळात बेननबी यांच्या झावियाह (Zawiyah) समाजात पारंपरिक संस्थांनी इस्लामी शिकवणूक जपण्यात अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडली. शिक्षण आणि औपचारिक अरबी साहित्य हे त्याचे उदाहरण. कथा सांगणाऱ्यांनी लोकसंस्कृती जपली, मशिदी आणि मदरशांनी बेननबी यांच्या शिक्षणात मोठे योगदान दिले. ते अरबी

व्याकरण, साहित्य, काव्य, न्यायशास्त्र व धर्मशास्त्र शिकले.

बेननबी यांनी त्यांच्या पहिल्या पुस्तकात कुरआनातील मुख्य संकल्पनांचा पुर्नअर्थ लावत सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांचे सिद्धांत स्पष्ट केले आहेत. त्यांचे धर्मावरील मध्यवर्ती शोधनिबंधातील विश्लेषण धर्माचा सार आणि त्याचे अभिसांस्कृतिक प्रक्रियेतील योगदान याविषयी मार्गदर्शन करणारे आहे. बेननबी यांच्यासाठी धर्म हा वैश्विक व्यवस्थेशी निगडित कायदा आहे, जो मानवी चेतनेला आकार देतो. फ्रान्समध्ये मुस्लिम विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या संपर्कात आल्यानंतर बेननबी यांनी इस्लामला वैश्विक परिप्रेक्ष्यात शोधले. बेननबी यांनी इस्लामला धर्म, जीवनपद्धती, समाजनिर्माता, संस्कृती आणि अभिसंस्कृती म्हणून गृहीत धरले.

शिक्षणाची समस्या मुस्लिम जगतातील मुख्य समस्या. तो बेननबी यांच्या चिंतनाचा विषय होता. दृष्टी, पद्धतिशास्त्र, साधने आणि कृती यांचा अभाव होता. विशेषतः वसाहती शोषणाच्या राजवटीतील अल्जेरियामध्ये दोन शिक्षणपद्धती त्यांच्या बुद्धी आणि आत्म्यातभिनलेल्या होत्या. त्यातून पारंपरिक शिक्षणपद्धतीच्या ऱ्हासाची कारणे आणि आधुनिक (पाश्चात्त्य-फ्रेंच) शिक्षणपद्धतीची प्रगती यांचा शोध सुरू झाला.

पहिली शिक्षणपद्धती अतिशय वाईट स्थितीत होती. तर दुसरी विस्तारत होती. तिला विकसित पद्धतिशास्त्राचा लाभ मिळत होता. तसेच स्पष्ट दृष्टी आणि वासाहतिक राजवटीचे संरक्षण होते. तरी तिची निधर्मी दृष्टी आणि पाश्चात्त्यीकरणाचे मिशन हे मुस्लिम अभिसंस्कृतीच्या चौकटीत विरोधाभासी ठरत होते. या विरोधाभासाने बेननबींचे लक्ष वेधले आणि त्याने त्यांचे जीवन आणि त्यांची संशोधनात्मक वाटचाल व्यापली.

युरोपियन आणि मुस्लिम अल्जेरियन वातावरणातील जीवनात आणि विचारांत बदल होत असल्याचे बेननबी यांनी हेरले. या दोन्ही संदर्भांनी त्यांच्या निसर्गाचा माणूस आणि अभिसंस्कृतीचा माणूस या संकल्पना प्रभावित झाल्या. मुस्लिम बुद्धिजीवी वर्तुळात त्यांना विचारांचे नवे प्रवाह जाणवले. अल्जेरियन समाजात उलेमा चळवळ समाजसुधारणेत दृष्टीकोन आणि पद्धत याबाबत न भूतो होती.

वासाहतिक अल्जेरियाचा नागरिक, दोन शिक्षणपद्धतींमधील विद्यार्थी

आणि युरोपीय वसाहतवाद्यांशी संपर्क या पार्श्वभूमीने बेननबी यांच्या संकल्पनांना आकार दिला. बेननबी यांनी वसाहत झालेले, वसाहत करणारे आणि वसाहत होण्याची स्थिती या तीन संकल्पना विकसित केल्या. त्यांच्यासाठी त्या आजच्या मुस्लिम मानसशास्त्राचे विश्लेषण करण्याचे साधन बनल्या.

बेननबी यांना असलेल्या युरोपीय विचारांच्या ज्ञानाने त्यांची बौद्धिक आणि राजकीय ज्ञानाची उंची वाढवली. त्यांचा रस अभियांत्रिकीतून तत्त्वज्ञानाकडे, सामाजिक शास्त्रांकडे वळला. पर्यायाने मुस्लिम सुधारणा विचार, वसाहतविरोधी चळवळ, आणि मुस्लिम जगत व अल्जेरियायी मुस्लिमांमध्ये पुनर्जागरणाचे प्रयत्न याकडे वळले. त्यांनी अल्जेरियातील उलेमा चळवळीचे महत्त्व ओळखले आणि इस्लाहची (सुधारणा) आणि मगरीबचे (उत्तर आफ्रिका) ऐक्य या संकल्पना प्रसृत केल्या. मुक्त आणि स्वावलंबी अल्जेरियासाठी उलेमांनी चालवलेली सुधारणावादी चळवळ आणि त्यांचे राजकीय नेत्यांकडे सामाजिक नेतृत्व सोपवणे याने बेननबी प्रभावित झाले. त्यांचा विश्वास होता की, राजकीय चळवळींपेक्षा शैक्षणिक व सांस्कृतिक चळवळी अधिक महत्त्वाच्या आहेत.

इजिप्तमधील राजकीय आश्रित म्हणून बेननबी यांनी बुद्धिजीवी आणि पारंपरिक संस्थांशी संपर्क साधला. अरब बुद्धिजीवींना प्रभावित करत त्यांनी अभिसांस्कृतिक प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यावर आणि मुस्लिम (समाज) उम्माच्या पुनर्जागरणावर लक्ष केंद्रित केले. बेननबी यांनी अल्जेरियात १९७१ मध्ये जगाचा निरोप घेतला. त्यांनी आधुनिक अल्जेरियातील सर्वांत थोर मुस्लिम विचारवंत म्हणून वारसा मागे सोडला.

बेननबी यांचे संबंध, त्यांचे सामाजिक - अंतर्गत पैलू आधि- सैद्धांतिकतेने निर्धारित केलेले होते. अविकसित कठीण विषय सोडवण्याकामी त्यांचा सांघिक प्रयत्नावर विश्वास होता. तसेच त्यासाठी मुस्लिम जगतातील आणि विकसित जगातील बुद्धिजीवींशी मजबूत संबंध आवश्यक असल्याचे त्याचे ठाम मत होते. मुस्लिम जगातील सुधारणावादी चळवळींशी त्यांचे मजबूत संबंधाचे निदर्शक उलेमा होते.

बेननबी यांनी पाश्चात्त्य संस्कृतीबाबत मुस्लिम बुद्धिजीवींच्या न्यूनगंडाचे विश्लेषण केले आहे. या विश्लेषणास त्यांची इस्लामविषयी

बांधिलकी आणि इब्न खल्दून यांच्याविषयीच्या कौतुकाने आकार दिला आहे. त्यांच्या मते, पारंपरिक संस्कृतीमधील बुद्धिजीवी (उलेमा) त्यांच्या महत्त्वाच्या कार्यात अल मुवाहीद (Muwahhid) युगाच्या चौकटीमुळे यशस्वी होणार नाहीत. उलेमांनी शुद्धतेवर आणि इस्लामी शिकवणुकीच्या संरक्षणावर भर दिला आहे. उत्तर अल मुवाहीद (Muwahhid) संस्कृती मधील आत्म्याचे आणि मानसिकतेचे नव्या संस्कृतीत झालेले परिवर्तन हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे.

बेननबी हे आधीच्या मुस्लिम विचारवंतांपासून प्रभावित झाले होते. उदा. इब्न तिमय्या, इब्न खल्दून आणि इब्न अब्दुल वहाब. ते स्वतःला या शृंखलेतील सुधारणावादी समजत. अरब देशांतील अनुभवानंतर त्यांचे विश्लेषण व्यापक झाले. त्यात त्यांनी इतर धार्मिक संकल्पनांचा समावेश केला. ऐतिहासिक बदलातील सामाजिक गमक आणि धर्माची भूमिका यांच्या अनेक स्पष्टीकरणांचा समावेश झाला.

प्रकरण पाचवे

## बेननबी यांच्या अभिसंस्कृतीविषयक दृष्टीकोनाची मुळे : बाह्य सामाजिक पैलू

आधिसैद्धांतिक दृष्टीकोनानुसार, बाहेरील सामाजिक घटक स्थूलस्तराच्या विश्लेषणावर लक्ष केंद्र करतात आणि परिप्रेक्ष्याचा उद्देश सांगतात. ते संस्थांची आणि त्यांच्या विचारांची ऐतिहासिक मुळे शोधतात. हे घटक समाजाकडे व्यापकतेने पाहण्यासाठी, तसेच सैद्धांतिकीरणाच्या विकासावरील प्रभाव पाहण्यासाठी ही स्थूलस्तराकडे वळणाऱ्या आधिसैद्धांतिकतेचे पैलू अधोरेखित करतात. बाह्य सामाजिक पैलू सैद्धांतिकीरणाची प्रक्रिया आणि विविध संस्था, समाजाचे थर यांच्यातील संबंधांचे महत्त्व सांगतात. तसेच, दृष्टीकोनाच्या विकासाशी किंवा सिद्धांताशी प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष संबंध असलेल्या इतर सामाजिक क्रियाकलापाचे महत्त्व सांगतात.

बेननबी यांनी मुस्लिम अभिसंस्कृतीच्या समस्यांची उकल वसाहतीकरण आणि निर्वसाहतीकरणाच्या संदर्भाने केली. त्यांचे व्यापक सामाजिक – ऐतिहासिक संदर्भ समजून घेण्यासाठी त्यांनी समाजशास्त्राचा वापर केला. ते वसाहतवाद हा पाश्चात्त्यांच्या संपूर्ण अभिसांस्कृतिक अजेंड्याचा भाग असून त्याला अभिसांस्कृतिक प्रतिक्रिया आतूनच देणे गरजेचे असल्याचे मानत होते.

स्थानिक लोकांना, रानटी लोकांना, आदिम जीवन जगणाऱ्यांना अभिसंस्कृत करण्याचा दावा पाश्चात्त्य करत असत. त्यांच्या या अभिसांस्कृतिक मिशनच्या दाव्याला मानववंशशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र आणि समाजशास्त्र या पाश्चात्त्य विज्ञानाने बळकटी देण्यात मदत केली. वरील रानटी, आदिम आदी संज्ञा वासाहतिक लोकांना आणि अभिसंस्कृतींना संबोधण्यासाठी वापरण्यात आल्या. त्यातून ते आणि इतर असा फरक करणारा भेदभाव आला. त्याने बाहेरील निकषांच्या माध्यमाने विस्तार आणि अंमल लादला. त्याने मुस्लिम देशांचे वांशिक, भाषिक वर्गानुसार तुकडे केले आणि लोकांची फाळणी केली. याने उम्माहचे ऐक्य नष्ट केले नसले तरी, ते धोक्यात जरूर आणले.

वसाहतपूर्व अल्जेरियायी समाज अभिसंस्कृतीच्या उत्तर टप्प्यात होता. या युगात तो समाजशास्त्रीयदृष्ट्या पूर्ण वसाहतीच्या काळापेक्षा उच्च विकासामुळे स्थिर होता. या काळात अल्जेरियाने सौहार्दाचे जीवन अनुभवले. राजकीय स्थैर्य, आर्थिक विकास, सांस्कृतिक निर्मिती, सामाजिक सौहार्द आणि साक्षरता अनुभवली. तिच्या उलेमांनी शिक्षणाचा प्रसार केला. इस्लामी शिकवणुकीचा प्रसार केला. अल्जेरियाची ओळख जपली.

दुर्दैवाने विकास आणि समृद्धी शेवटपर्यंत टिकत नाही. वसाहतवादी चळवळ चार मुख्य टप्प्यांतून जात तिने अल्जेरियायी समाजाच्या येणाऱ्या पिढीवर मोठा ठसा उमटवला आहे. आक्रमण आणि विरोधा चाटप्पा (१८३०-१८४८) फ्रान्सच्या मर्यादित अतिक्रमण धोरणाने सुरू झाला. अल्जेरीयायींना विरोधापासून वेगळे करण्यासाठी व तसेच त्यांचे सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि धार्मिक संरचना बदलण्यासाठी हे धोरण होते.

व्यापक अतिक्रमण आणि विरोधाच्या दुसरा टप्प्याने (१८४७-१८७१) अल्जेरियाची विभागणी केली आणि स्थानिक अल्जेरियायी लोकांवर अंमल बसवला. पूर्ण वसाहतीत रूपांतर आणि स्वीकार (१८७१-१९१९) टप्प्याने अल्जेरियायी मुस्लिमांचे अधिक शोषण केले. वसाहतवाद्यांची संख्या वाढली. चौथा टप्पा अल्जेरियाच्या जागा होण्याचा (१९१९-१९६२). या टप्प्यात वसाहतवादाने कळस गाठलेला आणि दुसरीकडे स्थानिक बुद्धिजीवी आणि राजकारण्यां मध्ये पॅन - इस्लामी (Pan - Islamist) सुधारणा आणि पुनरुज्जीवनची संकल्पना उदयास आली.

शेवटी, विशी-तिशीच्या दशकात सक्रिय झालेल्या सर्व देशांतील इस्लामच्या जोमदार आवाहनाने अल्जेरियायींना त्यांच्या सामूहिक ओळखीचे भान दिले. वसाहतीकरणाच्या चौथ्या टप्प्यात गुलाम करणाऱ्या आणि गुलामांमधील संघर्ष अतिशय तीव्र झालेला होता.

बेननबी यांच्या आकलनानुसार, अल्जेरिया त्याच्या वैभवशाली इतिहासाच्या तुलनेत आणि इस्लामी अभिसंस्कृतीच्या दर्जाच्या तुलनेत तो तीन शतके अराजक स्थितीत होता. वसाहतानुकूल स्थिती आणि वसाहतवाद यांच्यातील द्वंद्व यातून आलेली अराजकता आतून आणि बाहेरून होती.

बेननबींच्या मते, वसाहतवादाच्या जीवनातील सर्वांगिण अस्तित्वाने अराजकता आणली. वसाहतीचा उद्देश पूर्ण करण्यासाठी, विशेषतः मुस्लिम जगतात, वसाहतवादाने सर्व अभिसांस्कृतिक प्रक्रिया रोखली. समाजाच्या विविध अंगांमध्ये कृत्रिम भेद निर्माण केले.

उत्तरादाखल अल्जेरियायी राष्ट्रवाद दुहेरी प्रयत्नाने उदयास आला. एक बौद्धिक - धार्मिक स्तरावर उलेमांकडून तर राजकीय स्तरावर राजकीय नेत्यांनी आणला. तो बेननबी यांची रूपरसणी आणि निर्वसाहतीकरणाचे दोन उपरूपसरणी–सुधारणावादी आणि आधुनिकतावादी यांच्यातील संबंध दाखवतो.

बेननबी यांनी गृहीत धरले होते की, वसाहतीकरणाची समस्या आणि वसाहतानुकूल स्थितीची समस्या सोडवण्यासाठी आधी संपूर्ण संकटाच्या मुळाशी असलेल्या मूलभूत विषयाची उकल केली पाहिजे. तेही एकीकृत अशा अभ्यासचौकटीत. बेननबी यांची अभिसांस्कृतिक रूपसरणी मानवी स्थितीचे आणि अभिसंस्कृतीच्या चौकटीतील सामाजिक बदलांचे तुलनात्मक चौकटीत विश्लेषण करेल.

प्रकरण सहावे

## बेननबी यांच्या अभिसंस्कृतीविषयक दृष्टीकोनाची मुळे : अंतर्गत बौद्धिक पैलू

या प्रकरणात अंतर्गत बौद्धिक घटकांची चर्चा आहे. हे घटक आधि-सैद्धांतिकतेचे तिसरा पैलू म्हणून पुढे येतात. याचा संबंध अभिसंस्कृतीच्या क्षेत्रातील ज्ञान देणाऱ्या घटकांच्या अभ्यासाशी येतो. तसेच तो मुस्लिम जगतातील समस्या सोडवण्याच्या बेननबी यांच्या अभ्यास क्षेत्रात अंतर्गत घटक आहे. तो प्रमुख ज्ञानाच्या रूपसरणी, विचारशाखा, बदलांचे नमुने अधोरेखित करतो. तसेच विद्यमान सिद्धांतांचे विश्लेषण आणि नवा सिद्धांत विकसित करण्यासाठी सामान्य आधिसैद्धांतिकीकरणाच्या साधनांची ओळख करून देतो.

अभिसंस्कृतीच्या अभ्यासात दोन व्यापक रूपसरणींचा वरचश्मा असतो. एक, इतिहासाचे तत्त्वज्ञान आणि दुसरी सामाजिक शास्त्रे. अभिसंस्कृतीच्या अभ्यासाचे क्षेत्र खास आहे, त्याचे पद्धतिशास्त्र आणि संकल्पना सामाजिक शास्त्रांकडून येतात, असे बेननबी मानत. कुरआनाचे ज्ञान आणि धर्मांचा अभ्यास याच्या मदतीने बेननबी हे ज्ञानाची आणि ऐतिहासिक बदलांची भौतिकवादी व निधर्मी संकल्पना टाळू शकले. या अभ्यासात आधिसैद्धांतिकतेच्या अंतर्गत बौद्धिक पैलूच्या वापराने अभिसंस्कृतीच्या अभ्यासाच्या क्षेत्रात वरचश्मा असलेल्या रूपसरणींची जाणीव बेननबी यांना होती याचा उलगडा होतो.

या प्रकरणात काही संकल्पनांचे मूळ कर्ते असलेल्या विचारवंतांचा मार्ग काढण्यासाठी आशय विश्लेषण ही पद्धती वापरली आहे. प्रभावी रूपसरणींचे विविध विद्याशाखांचे व परिप्रेक्ष्यांचे विश्लेषण हे बेननबी यांच्या संकल्पना, संज्ञा व पद्धती, संबंधित क्षेत्रातील त्यांचा उगम यांच्यात आणि बेननबी यांच्या काळातील प्रभावी विचारशाखा व संपूर्ण इतिहास विषय यांच्यात संबंध प्रस्थापित करते.

इतिहासाच्या तत्त्वज्ञानाच्या रूपसरणीमध्ये तीन विचारशाखा त्यांच्या संबंधित रूपसरणींसह अभिसंस्कृतीचा अभ्यास व्यापतात. चक्राकार

दृष्टीकोन, प्रगतिशील दृष्टीकोन आणि सोबत अतिशय साधा असलेला मानवी समूहातील माणसांच्या वैविध्याचा दृष्टीकोन. ही रूपसरणी मानवी स्थितीतील ऐतिहासिक बदलाचामुख्य दृष्टीकोन आणि अभिसंस्कृतीशी संबंधित मुख्य विचारशाखा यांनी बनलेली असती. ती ऐतिहासिक बदलांच्या स्वरूपाचे निरीक्षण करत आणि त्या स्वरूपांचे सैद्धांतिकीकरण करत आकारला येते.

एकोणिसाव्या शतकातील ऐतिहासिक विकासाच्या विचार शाखेत हेगेल, कॉम्त आणि मार्क्स यांच्यासारख्या प्रमुख विद्वानांनी इतिहासाला विकासशील संबोधले. ही बाब बेननबी यांना त्यांच्या अभिसंस्कृतीच्या अभ्यासात महत्त्वाची ठरली. हेगेलच्या द्वंद्वविकासाच्या सिद्धांतात इतिहास म्हणजे मानवमुक्ती आणि अभिसंस्कृतीच्या विकासाची कथा आहे. यातील आणखी एक प्रमुख विचारवंत असलेल्या मार्क्सला हेगेलच्या या विचाराने प्रेरणा दिली. हेगेलने द्वंद्वविकास हा मानसिक मांडला. तर मार्क्सने ते आर्थिक साधनांसाठी वापरले.

विकासाच्या कल्पनेने प्रेरित होत कॉम्तने डार्विनचा उत्क्रांतीचा सिद्धांत आणि भौतिक विज्ञानाच्या विकासाची कल्पना मानवी स्थितीसाठी आणि ऐतिहासिक बदलांसाठी वापरली. या विचारशाखेने ऐतिहासिक बदलांचे, त्यांच्या टप्प्यांचे आणि कारणांचे स्पष्टीकरण दिले. हे तिचे मुख्य योगदान आहे.

बेननबी यांच्या मते, बहुतांश इतिहासकारांनी घटनांची जंत्री जमा केली. या घटनांचा तर्कसंगत अन्वयार्थ लावण्यासाठी अभ्यासाची चौकट विकसित केली नाही. हेगेलचा विरोधाभासी किंवा द्वंद्वविकासी सिद्धांत आणि मार्क्सने मांडलेल्या विरोधाभासी कारणांमुळे होणारे सामाजिक बदल हे आर्थिक स्वरूपाचे असतात या सिद्धांतात बेननबी यांनी संबंध पाहिला. त्यांनी बदलांसाठी उत्प्रेरक या हेगेलियनांच्या कल्पनेस मान्यता दिली, तर द्वंद्वविकासी विश्लेषणासाठी मार्क्सवाद्यांचे कौतुक केले. तसेच मार्क्सचा मानवी गरजांचा सिद्धांत अभिसंस्कृतीच्या जन्माचे पैलू स्पष्ट करू शकत नाही, हे ही स्पष्ट केले.

बेननबी यांनी ऐतिहासिक विकासाच्या सिद्धांतावर दोन कारणांसाठी टीका केली आहे. पहिले कारण म्हणजे हा विचार प्रत्यक्ष इतिहासाला धरून

असण्यापेक्षा सैद्धांतिक जास्त आहे. दुसरे कारण, त्याचे युरोपकेंद्री असणे. हा सिद्धांत अस्थिर ऐतिहासिक बदलांवर लक्ष केंद्रित करतो. तो बहुआयामी रसायन म्हणून अभिसंस्कृतीच्या गुंत्याकडे पाहात नाही, अशी टीका त्यांनी केली. इब्न खल्दून आणि टॉयन्बीसारख्या विद्वानांनी सांगितलेल्या चक्रीय सिद्धांताने बेननबी प्रभावित झाले होते. दृष्टीकोन आणि पद्धतिशास्त्राच्या बाबतीत बेननबी स्वतःला या विद्वानांच्या परंपरेतील मानत होते. हा सिद्धांत ऐतिहासिक बदलांमधील फरक स्पष्ट करून सांगतो. तसेच या बदलांना चक्रीय संकल्पना देतो. इतिहासकारांनी दिलेली माहिती अभ्यासून विद्वान ऐतिहासिक बदलांचे स्वरूप वैश्विक असल्याच्या निष्कर्षावर पोचले आहेत.

मुकद्दिमाह या (Muqaddimah) ग्रंथात इब्न खल्दून यांनी नियम आणि नमुने शोधण्याच्या इतिहासाच्या अभ्यासाचा पाया घातला. त्यांनी समाजाचे स्वरूप आणि सामाजिक बदल अभ्यासले. त्यातून ते अभिसंस्कृतीशास्त्रापर्यंत पोचले. त्याला ते इल्म अल उम्रान म्हणत. या पिढी दर पिढी, प्रक्रिया दर प्रक्रिया ही अभिसंस्कृतीला दिशा देत असते. त्यांनी असाबियाह (Asabiyyah) संकल्पना मांडली. ती ऐतिहासिक बदलांना चालना देणारी शक्ती आहे. तिच्यामुळे राज्यकर्त्या घराण्यांचा आणि राज्यांचा उदय, विकास आणि ऱ्हास होतो.

टॉयन्बी यांनी विश्वाचा इतिहास अभिसंस्कृतींच्या क्रमात म्हणून पाहिला. अभिसंस्कृती ही द्वंद्वाचे आव्हान आणि त्याला दिलेली प्रतिक्रिया यांच्या परिपाक असल्याचे सांगितले. विकास आणि ऱ्हासाचे टप्पेदेखील त्याचाच परिपाक मानले. त्यांनी अभिसंस्कृती म्हणजे संपूर्णता किंवा ऐतिहासिक बदलांच्या अभ्यासाचे आकलनक्षम घटक यावर जोर दिला. ते इब्न खल्दून यांच्यासारखे निश्चितवादी होते. त्यांनी अभिसांस्कृतिक प्रक्रियेचे सैद्धांतिकीकरण केले. ही प्रक्रिया निश्चितपणे अभिसंस्कृतीच्या स्खलन आणि ऱ्हासानंतर संपते.

अनेक संशोधक मान्य करतात की बेननबी हे त्यांच्या संकल्पना, पद्धती आणि संदर्भ या नात्याने दुसरे इब्न खल्दून आहेत. इतिहासातील अपघात आणि अभिसंस्कृतीचे चक्र या दोन्ही विचारतत्त्वांनी बेननबी यांचे लक्ष वेधले. त्यांचे मत होते की, चक्रीय सिद्धांत प्रगतीच्या आणि

अधोगतीच्या घडामोडींच्या स्थितीची चर्चा करण्याची संधी देतो. बेननबी यांनी इब्न खल्दून यांच्या राज्य संकल्पनेला सामाजिक-ऐतिहासिक अभ्यासाचे आकलनक्षम घटकात रूपांतरित केले. जेणे करून इतिहासाच्या अभ्यासासाठी अभिसंस्कृती हा घटक म्हणून वापरता येईल. टॉयन्बींकडून अभिसंस्कृतीला इतिहासाच्या विश्लेषणातील घटक म्हणून वापर, त्यांचा चक्रीय सिद्धांत आणि आव्हाने व त्यांना प्रतिसादाची कल्पना, या सर्वांनी बेननबी यांच्या दृष्टीकोनास प्रभावित केले.

बेननबी यांनी त्यांच्या समकालीन सामाजिक घटनांचे विश्लेषण करण्यासाठी सामाजिक शास्त्रांची पद्धती वापरली. तसेच अभिसंस्कृतीच्या प्रक्रियेतील धर्माचे योगदान याची चर्चा करण्यासाठीही वापरली. बेननबी यांच्या लेखी मुस्लिम पुनरर्जागरण प्रज्वलित करण्यासाठी समाजशास्त्र आणि मानसशास्त्र गरजेचे घटक होते. त्यांनी धर्माला सामाजिक मूल्यांचा समन्वयक म्हणून पाहिले. त्याला गतिशील देवाणघेवाणीत प्रवेश करू इच्छिणाऱ्या अभिसंस्कृतीचा उत्प्रेरक म्हणून पाहिले. बेननबी यांनी माणसाकडे बदलांची सुरुवात करणारे अभिसंस्कृतीचे प्राथमिक औजार म्हणून पाहिले. ते दोन प्रभावी रूपसारणी म्हणजेच इतिहासाचे तत्त्वज्ञान आणि सामाजिक शास्त्रे, तीन विचारशाखा आणि अभिसंस्कृती अभ्यासाच्या अनेक दृष्टीकोनांबाबत असमाधानी होते.

प्रकरण सातवे

## बेननबी यांच्या अभिसंस्कृतीविषयक दृष्टीकोनाचीमुळे : बाह्य बौद्धिक पैलू

आधिसैद्धांतिकतेच्या दृष्टीकोनातून आधिसैद्धांतिकतेच्या चौथ्या पैलूतबाह्य बौद्धिक घटकांचा इतर विद्याशाखांसाठी पर्यायी म्हणून समावेश होतो. त्यात ते सिद्धांताच्या विश्लेषणात कल्पना, साधने, संकल्पना आणि सिद्धांत यांची जागा घेतात. बाह्य बौद्धिक पैलू हा परंपरेने अभिसांस्कृतिक अभ्यासाबाहेरच्या समजल्या जाणाऱ्या विज्ञानांचा प्रभाव आणि संशोधन क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करतो. बेनाबींच्या बाबतीत या बाह्य बौद्धिक पैलूत कुरआनाचा प्रभाव आणि सुन्नाह, मुस्लिम जगतातील धार्मिक सुधारणावादी विचार, मानसशास्त्र, निसर्गशास्त्रे, तत्त्वज्ञान आणि अभिसंस्कृतीच्या अभ्यासाबाहेरील इतर बौद्धिक क्रियाकलाप, तसेच दोन पारंपरिक प्रभावी रूपसरणी यांचा समावेश होतो.

बेननबी यांनी कुरआनाच्या समीक्षेसाठी आणि अन्वयार्थासाठी विज्ञानातील आधुनिक शोधांची मदत घेतली आहे. तसेच सामाजिक शास्त्रांमधील आधुनिक विकासाचा आधार घेतला आहे. ऐतिहासिक बदलांची चक्रीय संकल्पना स्पष्ट करताना त्यांनी कुरआनाचा संदर्भ दिला. त्याआधारे अभिसांस्कृतिक प्रक्रियेत धार्मिक कल्पनांचे कार्य आणि इतिहासात कुरआनाच्या तत्त्वांचे स्थान स्पष्ट केले आहे. त्यांनी धर्म कशा पद्धतीने मानवी व्यक्तिमत्त्वात बदल घडवून आणतो आणि अभिसांस्कृतिक प्रक्रियेला दिशा देतो, याचा अभ्यास केला.

कुरआनातील श्लोक 'क्वचितच, जोपर्यंत लोक स्वतः त्यांच्यात बदल करत नाहीत, तोपर्यंत अल्लाह त्यांची स्थिती बदलत नाही,' हे बेननबी यांचे ब्रीदवाक्य होते. या ब्रीदवाक्याने मानवाच्या दर्जाचे आणि ऐतिहासिक बदलांतील, तसेच मानवी स्थिती बदलण्यातील मानवी घटकाच्या प्रभावाचे विश्लेषण करण्यासाठी एक चौकट प्रदान केली आहे. बेननबी यांनी सांगितले की, अभिसांस्कृतिक प्रक्रिया सुरू करण्यासाठी समाजाने माणसाचा दर्जा आदिम अशा निसर्गदत्त कच्चा दर्जापासून उन्नत होत अनुकूल व्यक्तीत बदलला पाहिजे.

कुरआनाची तत्त्वे ऐतिहासिक बदल समजून घेण्यास मदत करतात. तसेच बदलांच्या प्रक्रियेतील धर्माची भूमिका समजावून घेता येते. तर इतिहासाचा अभ्यास कुरआनाची तत्त्वे सिद्ध करण्यास मदत करतो. तो ज्याची तपासणी करणे शक्य आहे असा सज्जड पुरावा देतो. बेननबी मानवी अभिसंस्कृतीत धर्माची कोणतीच सक्रिय भूमिका नसते, असे म्हणणाऱ्या निधर्मी किंवा आधुनिक विचाराला विरोध करतात. त्यांनी कुरआन आणि सर्व प्रेषितांवर अवतरलेला संदेश, त्यांची शिकवणूक हे सर्व मानवी अभिसंस्कृतीचा अविभाज्य भाग आहे, असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला.

मुस्लिम जगतातील मागासलेपणाच्या समस्येची उकल करण्यासाठी आपण कुरआनात नमूद इतिहासातील निरंतर चालत आलेले नमुने अभ्यासले पाहिजेत. तसेच इब्न खल्दून यांनी स्पष्ट केलेल्या इतिहासातील बदलांच्या चक्रीय सिद्धांताचा, वैश्विक नमुन्यांचा आणि इतिहासाच्या नियमांचा आधार घेतला पाहिजे. आधिसैद्धांतिकतेच्या संर्दभाने कुरआन आणि सुन्नाह हे प्रमुख बाह्य बौद्धिक घटक आहेत, ज्यांनी बेननबी यांच्या अभिसंस्कृती विषयक दृष्टीकोनास प्रभावित केले आहे.

मुस्लिम जगतातील सुधारणावादी विचाराने स्वीकारलेल्या चळवळीच्या इस्लाह, तजदीद, आणि नहजाहया कल्पना (सुधारणा, नूतनीकरण आणि पुनर्जागरण) कसमोहर (हॉलमार्क) आहेत. त्या अठराव्या शतकाच्या मध्यात उदयास आलेल्या नव्या रूपसरणीच्या अभिव्यक्ती आहेत. इब्न अब्दुल वहाब यांच्या चळवळीने इस्लामचा मूळ आणि मूलभूत विश्वदृष्टीकोन पुनर्जीवित करण्याचा प्रयत्न केला. त्यात एक असण्याच्या कल्पनेस इतर सर्व गतिशील तत्त्वे मजबुतीने बांधली गेली आहेत. मुस्लिम जगतातील दुसरे सुधारणावादी मार्गदर्शक अल अफगानी हे देखील सुधारणेत किंवा पुनरुज्जीवनात यशासाठी इस्लामच्या शुद्ध शिकवणुकीची गरज आहे, असे मानणाऱ्या सुधारणावादी रूपसरणीपैकी आहेत. बेननबी यांनी या चळवळीची पायाभूत कल्पना तिच्या बौद्धिक दृष्टीकोनातून स्वीकारली.

अल्जेरियामध्ये सुधारणावादी मागासलेपणाकडे सर्वसमावेशक दृष्टीकोनातून पाहात नव्हते. व्यवस्थित संशोधनासाठी बेननबी मानसशास्त्राकडे वळले. मानवी व्यक्तिमत्त्व कशा पद्धतीने बदलू शकते आणि

ते अभिसांस्कृतिक प्रक्रियेच्या उद्देशासोबत कसे विकसित होते, हे समजून घेण्याचा त्यांचा उद्देश होता. त्यासाठी त्यांनी मानसशास्त्राचा आधार घेतला. धार्मिक कल्पना कशा पद्धतीने सामाजिक मूल्यांत प्रवेश करतात आणि मानवी दृष्टी उन्नत करतात, हे समजून घेण्याची त्यांना गरज वाटत होती.

बेननबी यांनी धर्माचे स्थान आणि कार्य याबाबत फ्राइड आणि युंग यांचा हवाला घेतला. सोबत पियाजे यांच्या वैकासिक मानसशास्त्राचा समावेश केला. बेननबी लिहितात, धार्मिक कल्पना ह्या मानवी आत्म्यास निसर्गदत्त नियमांपासून मुक्त करतात आणि अध्यात्माच्या (स्पिरीट) नियमाखाली आणतात. धर्म व्यक्तीच्या वर्तनास तिच्या सुप्त शक्तींच्या दिशेने नेतो आणि समाजाला सामायिक क्रियाकलाप सुरू करण्यासाठी भाग पाडतो. बेननबी यांना माणसाचे आंतरव्यक्तिमत्त्व बदलण्यातील धर्माची मनो-स्वाभाविक भूमिका समजून घेण्यात तसेच अभिसांस्कृतिक प्रक्रियेत व्यक्तीच्या सुप्त शक्तींना दिशा देणे आणि समूहांना सकारात्मक भूमिका देण्यातील योगदानही त्यांना फ्राइडच्या मदतीने समजावून घेता आले.

धार्मिक कल्पना जेव्हा अभिसंस्कृतीच्या प्रक्रियेस दिशा देण्याची गतिशील भूमिका हरवतात, तेव्हा समाजाची अभिसांस्कृतिक प्रक्रिया रसातळाला जाते. त्याच्या कल्पना एका सुरात काम करणे थांबवतात. बेननबी यांनी टप्प्यांची संकल्पना प्रामुख्याने इब्न खल्दून यांच्याकडून घेतली असली तरी, त्यांनी समाजाच्या मनो-सामाजिक प्रगतीचे विश्लेषण करण्यासाठी आधुनिक वैकासिक मानसशास्त्राचा आधार घेतला. त्यांनी व्यक्ती व समाज हे दोन्ही एक सारख्या तीन टप्प्यांतून जात असतात, या मतावर जोर दिला. अर्थात वस्तूंचे युग, व्यक्तींचे युग आणि संकल्पांचे युग. त्यांची ही मांडणी त्यांच्यावरील जाँ पियाजे यांचा प्रभाव दर्शवते.

बेननबी यांना प्रभावित करणारा चौथा बौद्धिक घटक म्हणजे तत्त्वज्ञान. तत्त्वज्ञान, कार्टेजियन (Cartesian) विचार आणि आधुनिकतेची चर्चा हे सर्व त्यांच्यासाठी बाह्य साधने होती. त्यात इब्न तुफेल, डॅनियल डिफो, इब्न रश्द आणि अल गझाली यांच्या कल्पनांचाही समावेश आहे. बेननबी यांची महत्त्वाची उसनवारी म्हणजे रेने देकार्त यांच्याकडून घेतलेली त्यांची विश्लेषणाची पद्धत. बेननबी यांनी अभिसंस्कृतीच्या संरचनेची तत्त्वे आणि

अभिसंस्कृतीच्या प्रक्रियेतील त्यांचे कार्य अभ्यासण्यासाठी दोन स्वतंत्र, पण एकमेकांशी जवळीकता असणाऱ्या विश्लेषणात्मक तंत्रव्यवस्था वापरल्या.

अभिसंस्कृतीकडे बहुआयामी रसायन म्हणून पाहणाऱ्या काही मोजक्या सिद्धांतकारांपैकी बेननबी हे एक आहेत. त्यांचे योगदान ही एक अतिशय महत्त्वाची घडामोड म्हणून सांगता येईल. पारंपरिक विस्कळित आणि विरोधाभासी रूपसरणीला पर्याय देणारे योगदान म्हणून गौरव करता येईल. व्यवस्था उभी करणारे म्हणून जसे बेननबी महत्त्वाचे आहेत, तसेच ते आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन देणारे सिद्धांतकार म्हणूनही महत्त्वाचे आहेत.

अभिसंस्कृतीच्या अभ्यासाचा आरंभबिंदू ठरवण्यात बेननबी यांना बाह्य सामाजिक घटकांनी मदत केली. ते त्यांच्या काळातील अल्जेरिया आणि मुस्लिम जगतातील स्थितीविषयी सजग होते. त्याने त्यांच्या समाजातील आणि उम्मा तोंड देत असलेल्या अनेकविध समस्यांवर योग्य उपाय शोधण्याकामी त्यांचा दृष्टीकोन आकारास आणला. पद्धतिशास्त्राच्या पातळीवर बेननबी यांनी इतिहासकारांच्या पद्धती वापरल्या. तर बौद्धिक आणि ज्ञानानुभूतीच्या पातळीवर त्यांनी विविध विद्याशाखांचा आधार घेत त्यांच्यात समन्वय साधला. त्याच्या मदतीने अभिसंस्कृतीचे ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक हे तीन पैलू अभ्यासले.

बाह्य बौद्धिक घटकांमध्ये कुरआन प्रभाव आणि सुन्नाह, मुस्लिम जगतातील धार्मिक सुधारणावादी विचार, मानसशास्त्र, निसर्गशास्त्रे, तत्त्वज्ञान आणि अभिसंस्कृतीच्या अभ्यासाबाहेरील इतर बौद्धिक क्रियाकलाप, तसेच दोन पारंपरिक प्रभावी रूपसरणी यांचा समावेश होतो.

अभिसंस्कृतीच्या अभ्यासाच्या बाबतीत बेननबी यांनी मांडलेल्या आणि विकसित केलेल्या आतंरविद्याशाखीय दृष्टीकोनावर भर देण्याची गरज आहे. तसेच संकल्पना, दृष्टीकोन, सिद्धांत यांचे आकारास येणे आणि विकसित होणे अभ्यासण्यासाठी आधिसैद्धांतिक दृष्टीकोन स्वीकारण्याची गरज आहे. ज्ञानाची निर्मिती आणि विकास याच्या सर्वसमावेशक आकलन देणाऱ्या संशोधन क्षेत्राच्या सुप्तक्षमता अभ्यासण्यासाठी ही हा दृष्टीकोन स्वीकारण्याची गरज आहे.

## लेखकाविषयी

बॅडरेन बेनलाहसेनहे बटना विद्यापीठातील (अल्जेरिया) तत्त्वज्ञान विभागातील अभिसंस्कृती अभ्यास व तत्त्वज्ञानाचा इतिहासविषयाचे सहयोगी प्राध्यापक आहेत. तसेच किंग फैसल विद्यापीठ (अल अहसा, सौदी अरब) येथील इस्लामी अभ्यास विभागातील कला विषयाचे प्राध्यापक आहेत. ते बननबी यांच्या लेखन कृतीचे तज्ज्ञ अभ्यासक आहेत. त्यांनी या विषयावर वेगवेगळ्या पत्रिकांमधून असंख्य लेख लिहिले आहेत. तसेच मोरोक्को, अल्जेरिया, सौदी अरब व मलेशिया येथे झालेल्या बेननबी व अभिसंस्कृती अभ्यास परिषदांमध्ये शोधनिबंध सादर केले आहेत.

Website : http://drbadrane.com

संक्षिप्त ग्रंथ मालिकेच्या स्वरुपात IIIT ग्रंथ मालिका :

संक्षिप्त स्वरूपातील IIIT ग्रंथ मालिका संस्थेद्वारे सोप्या भोषत प्रस्तुत एक मूल्यवान संकलन आहे. मूळ उद्देश हा आहे की, वाचकांना मूळ ग्रंथाचा परिचय प्राप्त व्हावा व ते वाचण्याची प्रेरणा प्राप्त व्हावी.

मुस्लिमांच्या ऱ्हासाच्या कारणांचा आणि पाश्चात्त्य जगाच्या यश आणि उन्नतीच्या कारणांचा उलगडा करणे हा प्रख्यात अल्जेरियन बौद्धिक आणि विद्वान मलिक बेननबी(१९०५–१९७३) यांच्या संशोधनाचा विषय. यात त्यांनी हयात खर्ची घातली. त्यांनी सिद्ध केले की मुख्य समस्या कुरआन किंवा इस्लामिक श्रद्धा यांच्यात नसून ती मुस्लिमांमध्ये आहे. बेननबी यांचा दृष्टीकोन अभ्यासण्यासाठी या पुस्तकात आधिसैद्धांतिकीकरण (मेटॅथेराइझिंग) पद्धतिशास्त्राचा उपयोग केला आहे. हे करत असताना यात बेननबी यांच्या सिद्धांतातील आणखी एका महत्त्वपूर्ण मूलतत्त्वावर प्रकाश टाकला गेला आहे. अभिसंस्कृतीचे संचालन हे आतील–बाहेरील आणि सामाजिक–बौद्धिक कारकांकडून होते. तसेच हे दोन्ही कारक अभिसंस्कृतीनेच जन्माला घातलेले असतात.

'माणूस + माती + काळ = अभिसंस्कृती' हे समीकरण, तसेच धर्मात सामावलेले सर्व महत्त्वाचे उत्प्रेरक यांचे विश्लेषण आणि मुस्लिमांच्या ऱ्हासाची कारणांचे विश्लेषण आहे. बेननबींच्या मते, कोणत्याही अभिसांस्कृतिक प्रक्रियेत माणूस केंद्रीय शक्ती आहे आणि त्याच्याशिवाय इतर दोन्ही घटकांना अर्थ नाही, हे आपल्याला स्पष्ट दिसते. मुस्लिमांनी त्यांची आध्यात्मिक स्थिती बदलल्याशिवाय ते समाजात लक्षणीय आणि दूरगामी अर्थपूर्ण बदल घडवून आणू शकत नाहीत हे बेननबी यांचे अचूक निदान कुरआनात ध्वनित झाले आहे.

खरंच, जोपर्यंत लोक स्वतः त्यांच्यात बदल करत नाहीत, तोपर्यंत अल्लाह त्यांची स्थिती बदलत नाही. (कुरआन १३:११)

Rs. 50/-

GENUINE PUBLICATIONS & MEDIA PVT. LTD.
B - 35 (LGF), Nizamuddin West, New Delhi - 110 013
Tel.: +91-11-41827475, 24352732, 24352048
info@genuinepublications.com | www.genuinepublications.com

978- 93- 91659- 21- 9